## डॉ.खत्री महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, विद्यार्थी सुरक्षा व समुपदेशन कार्यक्रम संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.३ :** स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील सखी सावित्री समितीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी १०.०० वाजता संपन्न झाली. या अनुषंगाने कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी सुरक्षा व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेबाबत जागृती निर्माण करणे तसेच मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन आणि समुपदेशनाचे महत्त्व समजावून सांगणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलाने करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर, प्रमुख मार्गदर्शिका सौ. स्मिता सुतवणे, वाहतूक नियंत्रण शाखा, चंद्रपूर दुसऱ्या मार्गदर्शिका स्त्री रोग तज्ञ डॉ. भारती मोहितकर तिसऱ्या मार्गदर्शिका समुपदेशिका सौ. प्रिया पिंपळशेंडे सोबतच आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. नरेश दहेगांवकर, सखी सावित्री समितीच्या प्रमुख आणि कार्यक्रमाच्या आयोजिका प्रा. सौ. सुवर्णा राऊत इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. सर्व मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी सुरक्षा, चांगला- वाईट स्पर्श, सायबर गुन्हे, तणाव, परीक्षाभिती आणि समुपदेशनाचे फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपच्या बदललेल्या यादीतील उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो आज चंद्रपुरात

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.३ :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये उमेदवार यादी बदलाच्या मुद्यावर मोठी चर्चा सुरू असतानाच, बदललेल्या यादी- तील उमेदवारांच्या प्रचारासाठी उद्या रविवार ४ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा चंद्रपुरात भव्य रोड शो आयोजित करण्यात आला आहे. या रोड शोला राजकीयदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



भाजपकडून काही प्रभागांतील उमेदवारांची नावे बदलल्यानंतर पक्षात नाराजीचे सूर उमटले. मात्र आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः मैदानात उतरल्याने बदललेल्या यादीतील उमेदवारांना बळ मिळणार काय, असे बोलले जात आहे. या रोड शोद्वारे पक्षातील असंतोष दूर करत 'एकसंघ भाजप'चा संदेश देण्याचा प्रयत्न केला जाणार का, याकडे सुध्दा बघितले जात आहे.

शहरातील प्रमुख मार्गांवरून हा रोड शो काढण्यात येणार असून, विविध चौकांत भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. बदललेल्या यादीतील उमेदवारांसाठी हा रोड शो निर्णायक ठरतो काय, हे सुध्दा बघितले जात आहे.निवडणुकीच्या ऐन धामधुमीत मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती मतदारांवर प्रभाव टाकू शकते, असा भाजपचा अंदाज आहे. विशेषतः अंतर्गत मतभेद, नाराजी आणि बंडखोरीच्या चर्चांवर पडदा टाकण्यासाठी या रोड शोचा उपयोग केला जाणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपच्या स्थानिक नेत्यांनी जोरदार तयारी सुरू केली असून, रोड शोसाठी शहरात ठिकठिकाणी स्वागत कमानी, फलक आणि झेंडे लावण्यात आले आहेत. पोलिस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, वाहतूक व्यवस्थेत आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत.

भाजपच्या बदललेल्या उमेदवार यादीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा रोड शो चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मानले जात आहे.

### बदललेल्या उमेदवार यादी प्रकरणात मुख्यमंत्री काय बोलतील याकडे सर्वांचे लक्ष

भाजपने जाहीर केलेल्या उमेदवार यादीत झालेल्या बदलांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. तिकीट वाटपाच्या अंतिम टप्प्यात काही उमेदवारांची नावे बदलण्यात आल्याने पक्षांतर्गत नाराजी, आरोप-प्रत्यारोप आणि शिस्तभंगाच्या कारवाईपर्यंत प्रकरण गेले आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा चंद्रपूर दौरा आणि त्यांचे वक्तव्य काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.भाजपच्या बदललेल्या उमेदवार यादीनंतर काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. काही ठिकाणी बंडखोरीची चर्चा तर काही प्रभागांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस पक्षातील मतभेदांवर स्पष्ट भूमिका मांडतात की केवळ निवडणुकीपुरते एकजुटीचे आवाहन करतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.
मुख्यमंत्री फडणवीस यांचा उद्या होणाऱ्या रोड शोदरम्यान उमेदवार यादीतील बदलाची कारणे, पक्षाची अधिकृत भूमिका आणि पुढील रणनीती स्पष्ट करणार का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. विशेषतः बदललेल्या उमेदवारांना दिले जाणारे समर्थन आणि नाराज कार्यकर्त्यांना दिला जाणारा संदेश यावर भाजपच्या प्रचाराची दिशा ठरणार असल्याचे मानले जात आहे.दुसरीकडे, विरोधी पक्षही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वक्तव्याकडे लक्ष ठेवून आहेत. उमेदवार यादीतील बदलावर त्यांनी थेट भाष्य केल्यास भाजपमधील अंतर्गत घडामोडींना नवे वळण मिळू शकते, तर या विषयावर मौन बाळगल्यास नाराजी वाढण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.एकूणच, भाजपच्या यादीतील बदललेल्या उमेदवार प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय बोलतात, पक्षातील असंतोषावर ते कसा तोडगा काढतात आणि मतदारांपर्यंत कोणता संदेश देतात, यावर चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीतील पुढील राजकीय चित्र अवलंबून राहणार आहे.

# निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्ष प्रतिनिधींची तिसरी बैठक

## आदर्श आचारसंहिता व निवडणूक प्रचाराबाबत आयुक्तांनी दिली माहिती

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.३ :** चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर ०२ जानेवारी २०२६ रोजी चंद्रपूर महानगरपालिकेत सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची व उमेदवारांची तिसरी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत निवडणूक प्रक्रिया, आदर्श आचारसंहिता तसेच निवडणूक प्रचाराबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अकुनुरी नरेश यांच्याद्वारे करण्यात आले.



यावेळी आयुक्तांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करताना, निवडणूक प्रचार करताना कायदेशीर मर्यादा, प्रचाराच्या वेळा, ध्वनिक्षेपकांचा वापर, भित्तीचित्रे, फलक, बॅनर, पोस्टर्स यासंदर्भातील नियम स्पष्ट केले. तसेच, शासकीय मालमत्तेचा गैरवापर टाळणे, सामाजिक माध्यमांवरील प्रचार करताना नियमांचे पालन करणे, धार्मिक, जातीय किंवा आक्षेपार्ह भाषेचा वापर टाळणे याबाबत विशेष सूचना देण्यात आल्या. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान राजकीय पक्ष प्रतिनिधींनी व उमेदवारांनी विविध सूचना व प्रश्न उपस्थित केले असून त्यांचे निरसन प्रशासनामार्फत करण्यात आले. आगामी निवडणूक पारदर्शक, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व पक्षांनी, उमेदवारांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सदर बैठकीस विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा होणार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.३ :** राज्य शासनाच्या निर्देशान्वये १५ जानेवारी हा दिवस ऑलम्पिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. स्वतंत्र भारताचे पहिले ऑलम्पिक पदक विजेते महाराष्ट्राचे सुपुत्र दिवंगत खाशाबा जाधव यांचा जीवनातून नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासनमान्य खाजगी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय, क्रीडा संघटना/असोशिएसन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, शासनाच्या क्रीडा योजनांचा लाभ/अनुदान मिळालेल्या सर्व संस्था, अन्य संस्था व मंडळे यांनी राज्य क्रीडा दिनाचे आयोजन करावे, असे निर्देश प्राप्त झाले आहेत.याअंतर्गत खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान या विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करावे. प्रा.संजय दुधाने लिखित 'ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव' हे पुस्तक प्रत्येक शाळा महाविद्यालयांच्या ग्रंथालयात खेळाडूंना वाचनासाठी उपलब्ध असावेत. क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी रॅलीचे / मॅरेथान स्पर्धांचे आयोजन करावे. शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध खेळासंदर्भातील नियमावली, ऑलिंपिक स्पर्धासोबतच अन्य महत्वाच्या स्पर्धा, त्यामधील यशस्वी खेळाडू व अन्य बाबी यांची प्राथमिक माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन तसेच ऑनलाईन संपर्क माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचा नामवंत खेळाडूंसोबत संवाद साधावा.
विविध खेळांचे प्रदर्शनीय सामने व विजेत्यांना पुरस्कार वितरण, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव, क्रीडा क्षेत्रातील यशवंत खेळाडू, प्रशिक्षक तसेच क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती यांच्या उपस्थितीत नवोदित खेळाडू, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी, पालक, क्रीडा प्रेमी, नागरिक यांच्यासोबत क्रीडा क्षेत्रातील करीअर संधीबाबत परिसंवाद व चर्चासत्रे आयोजित करावे. यशस्वी क्रीडा विषयक उपक्रम तसेच क्रीडा सुविधांनी युक्त क्रीडा संकुल, अकादमी संस्था यांना भेटी देणे व आपल्या स्तरावर क्रीडा विषयक अभिनव उपक्रम राबविण्यात यावे व अहवाल जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाला सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंच्या जयंती निमित्त राजुरा काँग्रेस द्वारा अभिवादन



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**राजुरा दि.३ :** भारतातील पहिल्या महिला शिक्षक, थोर समाजसुधारक, ज्ञानज्योती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण आणि स्त्री मुक्तीचे कार्य, त्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आज त्यांच्या जयंतीदिनी राजुरा तालुका काँग्रेस कमेटी कार्यालय, आशिफाबाद रोड, राजुरा येथे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

या प्रसंगी महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष निर्मला कुडमेथे, जिल्हा महासचिव एजाज अहमद, शहराध्यक्ष हरजीतसिंग संधू, नगरसेवक संध्या चंद्रशेखर चांदेकर,, अन्नु हरजितसिंग संधू, पुणम सारंग गिरसावळे, फरीना शाकीर सय्यद, माजी अध्यक्ष कविता उपरे, महासचिव प्रणय लांडे, सुमित्राबाई कुचनकर, अर्चना चल्लावार, उईकेताई, कानकाटेताई यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ख्रिस्तानंद विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**ब्रम्हपुरी दि.३ :** स्थानिक ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मुख्याध्यापिका सिस्टर पावना उपस्थित होते. कार्यक्रमाच्या औचित्याने विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित लघु नाटिका सादर केली. तसेच शाळेतील शिक्षिका प्रीती वाळके यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना यांनी अध्यक्षीय भाषण केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक सूरज मेश्राम यांनी सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा विद्यालयाला भेट दिली. कार्यक्रमाला विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पोदार प्रेप, ब्रह्मपुरी येथे नववर्ष २०२६ उत्साहात साजरे

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**ब्रम्हपुरी दि.३ :** पोदार प्रेप, ब्रह्मपुरी येथे नववर्ष २०२६ निमित्त आनंद, उत्साह आणि सकारात्मक वातावरणात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून शाळेची आनंदी शिक्षण पद्धती, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि सर्वांगीण बालविकासाची संकल्पना ठळकपणे दिसून आली.या नववर्ष साजरीकरणात पोदार प्रेप ब्रह्मपुरीतील सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाचा सक्रिय सहभाग लाभला. रंगीबेरंगी सजावट, संगीत, विविध खेळ, सर्जनशील कला उपक्रम आणि आत्मविश्वास वाढवणारे मंचावरील सादरीकरण यामुळे कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला.कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी अंमलबजावणी कार्यक्रम प्रभारी सोनाली सॉर्डे आणि रागिणी खरकाटे यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केले.या कार्यक्रमास शाळेच्या संचालिका वैशाली उराडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नेतृत्वाखाली पोदार प्रेप ही संस्था दर्जेदार व विश्वासार्ह प्री-प्रायमरी शिक्षणासाठी ओळखली जाते.कार्यक्रमाचे नेतृत्व प्राचार्या भावना डोंगारडीवे आणि मुख्याध्यापिका भावना थाटर यांनी केले. त्यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनामुळे आणि सततच्या सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व यशस्वी ठरला.शाळेच्या व्यवस्थापनाने सांगितले की, पोदार प्रेपमधील सण-उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून, त्यातून मुलांमध्ये आनंद, आत्मविश्वास, सहकार्य, सौजन्य आणि सकारात्मक मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला जातो.पालकांनीही शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत, मुलांसाठी सुरक्षित, आनंददायी आणि दर्जेदार शिक्षण देणाऱ्या पोदार प्रेप ब्रह्मपुरीवर विश्वास व्यक्त केला.




## पुयारदंड येथे नागदिवाळी उत्साहात साजरी




**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**चिमूर दि.३ :** तालुक्यातील पुयारदंड येथे २९ व ३०डिसेंबरला आदिवासी माना जमात मंडळ व विद्यार्थी संघटनेच्या वतीने मुक्ताई व नागदिवाळी महोत्सवाचे आयोजन केले होते.
२९ डिसेंबर रोजी परिसर स्वच्छ करून मठ पूजा करून सुरवात करण्यात आली. यानंतर महिलांसाठी हळदी कुंकू व प्रास्ताविक नितीन कुमार ननावरे घेण्यात आले. माजी राज्य रमेश कुमार गजबे. सामाजिक कार्यकर्ते हेमंत जांभुळे. दिनकरजी चौधरी सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ वैद्य, विजुभाऊ घरत, सामाजिक कार्यकर्ते तलाश कुमार खोब्रागडे, यानंतर आयोजित - मार्गदर्शन कार्यक्रमाला माजी सरपंच सुधाकर जाभुळे.किसन जाभुळे. ग्रामपंचायत सदस्य मीनाक्षी जांभुळे केशव ननावरे, नथू ननावरे होते.
सकाळी पूजा अर्चा करून माता मानिकादेवीच्या प्रतिमेची गजरात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिला-पुरुषांनी आकर्षक वस्त्र परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून आदी उपस्थित होते. या प्रसंगी माना आदिम जमातीच्या परंपरा संस्कृती चालीरीती रूढी यावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आदिवासी, माना समाजबांधव, परिसरातील नागरिक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादाने दोन दिवसीय कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विनायका कॉटन जिनिंगमध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी लकी ड्रॉचे आयोजन



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**राजुरा दि.३ :** तालुक्यातील आर्वी जवळील विनायका कॉटन जिनिंगमध्ये कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया (CCI) अंतर्गत कापूस विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी दिनांक १८ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान लकी ड्रॉ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कालावधीत राजुरा तालुक्यासह परिसरातील हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्रीसाठी विनायका कॉटन जिनिंग येथे आणला होता.
कापूस उत्पादक शेतकऱ्यांना विशेष प्रोत्साहन मिळावे, तसेच अधिकाधिक शेतकऱ्यांनी कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया अंतर्गत आपला कापूस विक्री करावा व त्यांच्या कापसाला योग्य मोबदला मिळावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे विनायका कॉटन जिनिंगच्या संचालकांनी सांगितले.या लकी ड्रॉ स्पर्धेत कापूस विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली होती. त्यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस टीव्ही ईश्वर मुसळे यांना मिळाले, तर द्वितीय क्रमांकाचे बक्षिस इंटेक्स कंपनीचा मोबाईल श्यामसुंदर पारखी यांना, आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस ब्लूटूथ स्पीकर धनराज मुसळे यांना प्रदान करण्यात आला. तसेच या सर्व विजेत्यांच्या वाहन चालकांना रोख रक्कम २१००, १५००, व ११०० रुपये प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, राजुराचे सभापती विकास देवाळकर उपस्थित होते. तसेच कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाचे भावेश पटेल, ललित पटेल, अमरेश पटेल, विनायका कॉटन जिनिंगचे संचालक पांडुरंग चिल्लावार व रमेश झंवर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वीप अभियानाअंतर्गत मनपातर्फे मतदान जनजागृती बाईक रॅली

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.३ :** चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये मतदारांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे स्वीप (Systematic Voters' Education and Electoral Participation) अभियानाअंतर्गत आज सकाळी ९ वाजता मतदान जनजागृती बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

'१५ जानेवारी तारीख लक्षात आहे ना?' असा उद्घोष करणारी ही रॅली जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह तसेच महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून गांधी चौक येथून प्रारंभ करण्यात आली.



महानगरपालिका निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये विविध माध्यमांतील प्रसिद्धी, नागरिकांशी थेट संवाद, पथनाट्य, रांगोळी, चित्रकला, निबंध, प्रश्नमंजुषा, रील्स, सेल्फी आदी स्पर्धा व उपक्रमांचा समावेश आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.रॅलीदरम्यान मतदान जनजागृतीचा संदेश देणारे फुगे (बॅलून्स) आकाशात सोडण्यात आले. तसेच नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी स्वाक्षरी बॅनर मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमास महिला व पुरुष नागरिकांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रॅलीमध्ये अग्निशमन दलाच्या गाड्यांचाही सहभाग असून, त्यावरून मतदान जनजागृती करणारी गाणी वाजविण्यात येत होती. '१५ जानेवारी लक्षात आहे ना?', 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा होष्ठ', 'मतदान हा तुमचा अधिकार आहेष्ठ', तसेच 'येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुकीत नक्की मतदान कराष्ठ' अशा घोषणांद्वारे नागरिकांना मतदानासाठी प्रेरित करण्यात आले. गांधी चौक येथून सुरू झालेली ही रॅली जटपुरा गेट, प्रियदर्शिनी चौक, वरोरा नाका, जनता कॉलेज चौक, ट्रॅफिक ऑफिस चौक, सावरकर चौक, बंगाली कॅम्प चौक मार्गे पुन्हा प्रियदर्शिनी चौक, जटपुरा गेट, गिरनार चौक असा मार्गक्रमण करत चंद्रपूर महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत पोहोचली.रॅलीदरम्यान रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मताचे असलेले महत्त्व, मतदान न केल्यास होणारे परिणाम तसेच जबाबदार नागरिक म्हणून मतदान करण्याची आवश्यकता याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप रामटेके तसेच रोटरी क्लबच्या सर्व सदस्यांचा सक्रिय सहभाग लाभला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी मा. पुलकित सिंह, महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त व स्वीपचे नोडल अधिकारी संदीप चिद्रावार, सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी, शहर अभियंता रवींद्र हजारे, नगरसचिव नरेंद्र बोबाटे, सहायक आयुक्त अनिल घुले, संतोष गर्गेलवार तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन

# यवतमाळ जिल्हा

रविवार, ४ जानेवारी २०२६



## ई-मित्र' चॅटबोट : दोन क्लिकवर शासकीय योजनांची माहिती

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, प्रतिनिधी, दि.२ जानेवारी

विविध योजनांची माहिती नागरिकांना पारदर्शक आणि विनामूल्य स्वरूपात उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या संकल्पनेतून 'ई-मित्र' चॅटबोट प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. त्याद्वारे योजनेची परिपूर्ण माहिती केवळ दोन क्लिकवर मिळत असल्याने नागरिकांकडून वापर वाढत असून, जिल्ह्यात आतापर्यंत 42 हजार 452 नागरिकांनी लाभ घेतला आहे. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना विनामूल्य व पारदर्शक स्वरूपात मिळावी या हेतूने जिल्हाधिका-यांच्या संकल्पनेतून 'ई-मित्र' चॅटबोट प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित या प्रणालीमध्ये वापरकर्त्यांचे प्रश्न समजून घेऊन अचूक आणि उपयुक्त माहिती देण्याची क्षमता असते.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-

गुरूमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-

संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०

* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### मोटरसायकल स्लिप झाल्याने चालकाचा मृत्यू

•युवाराष्ट्र दर्शन पाटण

पांढरकवडा तालुक्यातील येणाऱ्या बोरी येथील राहुल अशोक बोगावार हा त्याच्या ताब्यातील मोटरसायकल घेऊन बोरी येथून माथार्जुन रस्त्याने जात असताना त्याची मोटरसायकल याच रस्त्यावर स्लीप झाल्याने गंभीर जखमी झाला आणि जागीच मृत्यू पावला हा अपघात रात्री साडेदहा वाजता झाला होता या अपघात प्रकरणी अविनाश बोगावार यांनी पाटण पोलीस स्टेशनला माहिती दिली. पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### किरकोळ कारणावरून मारहाण

•युवाराष्ट्र दर्शन पारवा

पारवा येथील संदीप अशोकराव देशमुख वय वर्षे 32 हा गावातील चौफुली जवळ रोडवर उभा असतांना त्याला दादू खांडरे वय वर्षे 35 येणे तू चौफुली जो उभारून काय करतो अशी विचारणा केली आणि त्याच्यासोबत वाद घातला यातच दादू खांडरे याने त्याला हातातील कड्याने डोक्यावर मारून जखमी केले ही घटना रात्री अकरा वाजता घडली.

### अपघातात एक ठार

•युवाराष्ट्र दर्शन राळेगाव :

पेट्रोलपंप समोर बुधवारी सायंकाळी दुचाकीला कंटेनरने धडक दिली. यात सावंगी पेरका रोडवर दत्ता मधुकर नवघरे (५२), उमेश सुरेश हरणे (२६) दोघेही रा. वाठोडा हे गंभीर जखमी झाले.रुग्णालयात जात असताना उमेश हरणे यांचा रस्त्यातच मृत्यू झाला.हे दोघेही दुचाकीने (क्र. एमएच. २९ एएक्स. ८६२२) वाठोडा येथे जात असताना विरुद्ध दिशेने येत असलेल्या कंटेनरने धडक दिली.

### मिशन उभारी अंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा सर्वे व मदत उपक्रम

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

शेतकरी आत्महत्या प्रतिबंध तसेच संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी राज्य शासनाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या 'मिशन उभारी अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त व संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा देण्यात आला. या अभियानाअंतर्गत आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्याचे धनादेश तसेच विविध शासकीय योजनांचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी विकास मीना म्हणाले, "मिशन उभारी हा केवळ शासकीय उपक्रम नसून अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना मानसिक, सामाजिक व आर्थिक आधार देणारी सतत चालणारी प्रक्रिया आहे.

# पुतळा तिथेच पुन्हा सन्मानाने बसवा

## सावित्रीबाई फुलेंचा पुतळा प्रशासनाने हटविल्याने अनुयायी संतप्त : मुख्यमंत्र्यांना निवेदन



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३ जानेवारी

भारतीय स्त्री शिक्षणाच्या जनक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून यवतमाळ येथील स्टेट बँक चौकात बसविण्यात आलेला त्यांचा पुतळा प्रशासनाने हटविल्यामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे. सर्व ना हरकत प्रमाणपत्रे असतानाही प्रशासनाने कोणाच्या दबावाखाली ही कारवाई केली, असा सवाल उपस्थित करत यवतमाळ येथील फुले, शाहू, आंबेडकर यांचे अनुयायी व सामाजिक संघटनांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला आहे. 'ज्या ठिकाणी पुतळा होता, तिथेच पुन्हा सन्मानाने बसवा'अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

मिळालेली माहिती अशी की, या पुतळ्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने २७ ऑगस्ट २०१९ रोजी, पोलीस अधीक्षकांनी २० सप्टेंबर २०१९ रोजी आणि मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांनी २० सप्टेंबर २०१९ रोजीच 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) दिले होते. या सर्व कायदेशीर परवानग्यांच्या आधारेच नागरिकांनी २ जानेवारी रोजी पुतळ्याची स्थापना केली होती. मात्र, प्रशासनाने अचानक हा पुतळा तिथून हटविल्याने खळबळ उडाली आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच आज देशातील स्त्रिया सक्षम झाल्या आहेत, अशा थोर व्यक्तिमत्त्वाचा पुतळा हटविणे हा समस्त स्त्रीशक्तीचा आणि अनुयायांचा अपमान असल्याचे निवेदनात म्हटले आहे. "शासनाने आमच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. ज्या ठिकाणी पुतळा होता, त्याच ठिकाणी तो सन्मानाने पुन्हा बसवावा," अशी आग्रही मागणी अनुयायांनी केली आहे.

या प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई करावी आणि राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत त्वरित निर्देश द्यावेत, यासाठी अनुयायांनी प्रशासनाला निवेदन दिले आहे. सावित्रीबाईंच्या जयंतीदिनीच (३ जानेवारी) हा वाद पेटल्याने शहरात तणावपूर्ण शांतता असून, पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## सभापती श्रीधर पाटील ठाकरे यांची जिल्हा बँक प्रतिनिधीपदी अविरोध निवड



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. ३ जानेवारी

सहकार क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले तसेच सर्वसामान्य शेतकरी व सभासदांचा विश्वास संपादन केलेले खरेदी विक्री संघ आर्णी चे सभापती श्रीधर पाटील ठाकरे यांची जिल्हा बँक प्रतिनिधीपदी अविरोध निवड झाली आहे. या निवडीमुळे आर्णी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीधर पाटील ठाकरे यांच्या प्रदीर्घ अनुभवपूर्ण नेतृत्वाचा आणि दूरदृष्टीचा लाभ जिल्हा बँकेच्या कामकाजाला निश्चितच होईल, असा विश्वास सहकार क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल विलास पाटील राऊत, उमेश पाटील ठाकरे, दिनेश ठाकरे, रमेश ठाकरे,अनुप तिवारी,विशाल बिनोद ठाकरे,गजानन ठाकरे, भारत भवरे, विजय राठोड,प्रकाश जाधव, नारायण हजारे, वसंता वंजारे, विजय ठाकरे सोसायटी अध्यक्ष (कोसदनी) यांच्यासह विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून आगामी कार्यकाळासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत. या निवडीची सर्व श्रेय त्यांनी बोलताना सभासदांना दिले कोसदनी , आंबोळा, मुकुंदपुर, यांना दिले

## स्वर्णलिला इंटरनॅशनल स्कूलमध्ये महाखेल उत्सव



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ३ जानेवारी

विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण होऊन शारीरिक व मानसिक विकास साधावा, या उद्देशाने वणी येथील स्वर्णलिला इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहानिमित्त *"महाखेल उत्सव"*चे आयोजन करण्यात आले. दिनांक ०३ जानेवारी २०२६ (शनिवार) रोजी या उत्सवाचा भव्य शुभारंभ झाला असून हा क्रीडा सप्ताह ०३ ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत साजरा केला जाणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे चेअरमन डॉ. व्ही. नरेंद्र रेड्डी यांच्या हस्ते माता सरस्वती पूजन करून करण्यात आली. यावेळी थोर समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर वार्षिक क्रीडा सप्ताहाच्या प्रारंभाची औपचारिक घोषणा करत *"महाखेल उत्सव २०२५"*ची मशाल पेटवून उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या अन्नपूर्णा, उपप्राचार्य विक्की मोहनानी यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेतील ध्रुव, लक्ष्य, सरस आणि तेजस या चारही हाउसच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पथकांसह शिस्तबद्ध व आकर्षक पथसंचलन सादर केले. विद्यार्थ्यांनी संस्थेचे चेअरमन, प्राचार्या व उपप्राचार्य यांना मानवंदना देत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

महाखेल उत्सवात विद्यार्थ्यांसाठी व्हॉलीबॉल, थ्रो बॉल, बास्केटबॉल, क्रिकेट, खो-खो, कबड्डी तसेच विविध मैदानी स्पर्धा यांचा समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण, शिस्त व क्रीडास्पर्धेची जाणीव निर्माण होत असल्याचे चित्र दिसून आले.

कार्यक्रमादरम्यान विविध शैक्षणिक परीक्षांमध्ये व क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. तसेच "खेल उत्सव" या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक नृत्य कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले व उपस्थितांकडून त्याला भरभरून दाद मिळाली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## दारव्हा येथे मराठी पत्रकार दिनानिमित्त प्रा. वसंत हंकारे यांचे व्याख्यान



•युवाराष्ट्र दर्शन, प्रतिनिधी, दारव्हा, दि. ३ जानेवारी

मराठी पत्रकारितेचे जनक स्व. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या मराठी पत्रकार दिनाच्या औचित्याने दारव्हा येथे वैचारिक व प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रेस क्लब दारव्हा यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात ज्येष्ठ अभ्यासक प्रा. वसंत हंकारे हे "न समजलेले आई–बाबा" या महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

हा कार्यक्रम दि. ६जानेवारी दुपारी 2 वाजता, दारव्हा नगर परिषद शाळा क्रमांक २ येथे संपन्न होणार आहे. बदलत्या सामाजिक वातावरणात पालक व मुलांमधील संवाद कमी होत चालला असून, त्याचे गंभीर परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होत असल्याचे चित्र समाजात दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रा. हंकारे आपल्या व्याख्यानातून पालक–मुलांमधील नातेसंबंधांचे वास्तव उलगडणार आहेत.

मुलांच्या शिक्षणासाठी घराबाहेर पाठवणे, सुरक्षिततेचा प्रश्न, पालकांच्या अपेक्षा आणि मुलांची मानसिक अवस्था या सर्व बाबींवर प्रा. हंकारे सखोल मार्गदर्शन करणार आहेत.

आई-वडील व मुले यांच्यातील भावनिक, सामाजिक आणि संस्कारात्मक पातळीवरील नाते समजून घेण्याची आज नितांत गरज आहे. योग्य संवाद, समज आणि वेळ देणे यामुळेच हे नाते दृढ होऊ शकते, असा संदेश या व्याख्यानातून दिला जाणार आहे.

दारव्हा शहर व ग्रामीण परिसरातील पालक, युवक-युवती, विद्यार्थी, शिक्षक तसेच सर्व नागरिकांनी या व्याख्यानाला उपस्थित राहून लाभ घ्यावा, आवाहन दारव्हा प्रेस क्लब यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगराध्यक्ष ॲड. उईके यांच्या हस्ते दामिनी पथकाचे उद्घाटन



•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ प्रतिनिधी, दि. ३ जानेवारी

पोलीस विभागाकडून चालविण्यात येणारे दामिनी पथक काही दिवसापासून अस्तित्वहीन झाले होते त्यामुळे यवतमाळ शहरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न नव्याने गंभीर झाला होता, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी ऊईके यांनी थेट मुख्यमंत्री यांच्याच दालनात हे प्रकरण नेले, त्यांच्या आदेशानंतर यवतमाळतील दामिनी पथक आज नव्या दमाने पोलीस अधीक्षक यांनी कार्यरत केले आहे.

मुळातच दामिनी पथकामध्ये अतिशय कमी कर्मचारी देण्यात आली असून यातही जे कर्मचारी आहेत त्यांच्याकडे कुटुंबाचे वाद सोडविण्याचा कारभार सोपविण्यात आला आहे त्यामुळे दामिनी पथकाला आपले मूळ काम करता येत नव्हते

यावर मंत्र्यांसह सर्वांनीच दामिनी पथक प्रभावित व्हावे यासाठी आदेश दिले आणि याच आदेशाला पोलीस अधीक्षक यांनी होकार देत हे पथक कार्यरत केले यासाठी एक नवीन वाहन त्यांना देण्यात आले या कार्यक्रमाला आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, महिला नगरसेविका मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या त्यांच्याच हस्ते श्रीफळ फोडून नवीन वाहनाला हिरवी झेंडी दाखवून महिलाच्या सुरक्षे करिता दामिनी पथक आधुनिक वाहनास रवाना केले. यावेळी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सांगितले की, महिलांची सुरक्षा ही पोलिस विभागाची सर्वोच्च जबाबदारी असून दामिनी पथकामुळे महिलांना त्वरित मदत, जलद प्रतिसाद आणि प्रभावी कार्यवाही मिळणार आहे हे दामिनी पथक, शाळा, कॉलेज परिसर, बाजारपेठा सार्वजनिक ठिकाणी वाहतूक केंद्रीय व गर्दीच्या भागात नियमित गस्त घालून महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना बळकट करणे हा या पथकाचा प्रमुख उद्देश असल्याचे पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले. आज झालेल्या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, महिला नगरसेविका, पोलीस निरीक्षक श्रीमती दीपमाला भेंडे, पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे, पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित चौधरी, आरपीआय सकाटे, एमटीओ ढवळे, पोलीस विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिर व वृक्ष लागवड कार्यक्रम



•युवाराष्ट्र दर्शन ता. प्र. पुसद, दि. ३ जानेवारी

: दिनांक 2 जानेवारी 2026 रोजी नाम फाऊंडेशन पुसदच्या वतीने नाम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष समाजभान असलेले ज्येष्ठ अभिनेते श्री नाना पाटेकर यांच्या 75 व्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत आरोग्य तपासणी शिबिर श्री स्वामी समर्थ केंद्र, सप्तगिरी नगर पुसद येथे आयोजित करण्यात आले .

या शिबिरामध्ये सीबीसी, थायरॉईड, कोलेस्ट्रॉल, ट्रायग्लिसराइड, एस बी ए वन सी, लिपिड प्रोफाइल, हिमोग्लोबिन,प्लेटलेट,सिकलसेल यांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात केक कापून आणि त्यानंतर वृक्षारोपण करण्यात आले. आरोग्य तपासणी शिबिर मध्ये 235 जणांनी आपली तपासणी करून या उपक्रमाचा लाभ घेतला.

या शिबिरामध्ये वाढदिवसानिमित्य नाम फाउंडेशन पुसद तर्फे 15 खुर्च्या श्री स्वामी समर्थ केंद्राला भेट देण्यात आल्या. या उत्कृष्ट कार्याबद्दल परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त करून नाम फाउंडेशन यांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नाम फाऊंडेशन पुसद व सप्तगिरी नगर मधील नागरिकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद रायपूरकर यांनी तर आभार स्वप्नील देशमुख यांनी मानले.

# ढाणकी नगरपंचायतीत सत्तेचा पेच कायम

## भाजपचा 'मॅजिक फॉर्म्युला' की शिंदेंच्या शिवसेनेची साथ? गटनेता पदी मल्हार यांची नियुक्ती




•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी प्रतिनिधी, दि. ३ जानेवारी

ढा णकी नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष पदावर शिवसेना (ठाकरे गट) विराजमान असली, तरी नगरपंचायतीत सत्तेचा खरा 'रिमोट कंट्रोल' कोणाकडे राहणार, याचा तिढा अद्याप सुट लेला नाही. भारतीय जनता पक्षाने अपक्ष नगरसेवकांना सोबत घेऊन नऊ जणांचा गट स्थापन केल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, प्रभाग ४ चे नगरसेवक मल्हार यांची भाजपच्या गटनेता पदी नियुक्ती झाल्याने सत्तेच्या समीकरणाची चर्चा शहरात रंगली आहे.

ढाणकी नगरपंचायतीत ए कूण १७ जागांपैकी भाजपचे ७ नगरसेवक निवडून आले आहेत. बहुमतासाठी आवश्यक असलेला आकडा गाठण्यासाठी भाजपने २ अपक्ष नगरसेवकांना आपल्या गोटात सामील करून घेतले आहे. ९ नगरसेवकांच्या या बलानंतर भाजपने आपला गट अधिकृतपणे स्थापन केला असून गटनेता म्हणून मल्हार यांच्या खांद्यावर धुरा सोपवली आहे. या 'मॅजिक फॉर्म्युला'मुळे भाजप सत्ता स्थापनेच्या शर्यतीत आघाडीवर असल्याचे दिसत आहे. दुसरीकडे, शिंदे यांच्या शिवसेनेचे ३ नगरसेवक कोणाला साथ देणार, याबाबत तर्क-वितर्क लावले जात आहेत. भाजपने या ३ नगरसेवकांना आपल्या जवळ केले आहे की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी, जर हे नगरसेवक भाजपच्या बाजूने उभे राहिले, तर भाजपचे पारडे जड होणार आहे. मात्र, सध्या तरी शिंदे गटाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्याचबरोबर नगराध्यक्षाला दोनमताचे अधिकार असल्याच्या चर्चेमुळे समीकरण तर्कवितरकाची होत आहे

### नगरपंचायतीचे सद्यस्थितीतील पक्षीय बलाबल:

**भाजप: ०७, शिवसेना (शिंदे गट): ०३**
**शिवसेना (ठाकरे गट - नगराध्यक्ष): (नगराध्यक्ष पद या गटाकडे आहे), एमआयएम (MIM): ०३, काँग्रेस: ०२**
**अपक्ष: ०२ (भाजप समर्थित)**

### उपाध्यक्ष कोण? मतदारांमध्ये उत्सुकता

**नगराध्यक्ष पद ठाकरे गटाकडे असतांना, आता 'उपाध्यक्ष' पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याची मोठी उत्सुकता मतदारांमध्ये आहे. भाजप आपल्या नऊ नगरसेवकांच्या बळावर उपाध्यक्ष पद पदरात पाडून घेणार की एमआयएम आणि काँग्रेसच्या भूमिकेमुळे नवीन समीकरण जुळणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सध्यातरी ढाणकीच्या राजकीय वर्तुळात सत्तेची 'गडगड' सुरू असून अंतिम निर्णयाकडे सर्वांचे डोळे लागले आहेत**

## विठोली (मा) गावात चारचाकीतून जनावरांची चोरी

### ग्रामस्थांत भीतीचे वातावरण



•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी, दिग्रस, दि.३ जानेवारी

तालुक्यातील विठोली मा. गावात चारचाकी वाहनातून जनावरे चोरी करून नेण्याचा प्रकार समोर आल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी रात्री १.२० मिनिटांनी काही संशयित इसम चारचाकी वाहनात जनावरे भरून अवैधरित्या नेत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. या प्रकारामुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून, यापूर्वीही अशा चोऱ्यांचे प्रकार घडल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. शिवाय तालुक्यातील अनेक गावातील यापूर्वी गोवंश चोरी गेल्याच्या घटना गेल्या असून वेळेवर हस्तक्षेप न झाल्यास भविष्यात अशा घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या प्रकरणी ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलीस प्रशासनाने सदर घटनेची गांभीर्याने दखल घेऊन तपास सुरू करावा, अशी मागणी गावकऱ्यांतून होत आहे.



# बालांगण

## जाणून घ्या कोणतीही भाषा

**ज**गभरात अनेक भाषा बोलल्या जातात. विविध भाषांच्या माध्यमातून संदेश दिले जातात. आता सगळ्या भाषा येणं काही शक्य नाही. पण ही अडचण दूर करायची असेल तर ही ॲप्स डाउनलोड करता येतील. या ॲपमुळे कोणत्याही भाषेचं हिंदी भाषांतर होऊ शकतं.




✽ 'गुगल ट्रान्सलेट' हे अनोखं ॲप आहे. या ॲपमध्ये आता ऑफलाईन फीचरही ॲड झालं आहे. या ॲपच्या मदतीने १३० भाषांचा अनुवाद करता येईल. ॲप स्टोअरमधून हे ॲप डाउनलोड करता येईल.

✽ 'ट्रान्सलेट: टेक्स्ट ॲंड व्हॉईस ट्रान्सलेटर'च्या मदतीने १०० भाषांचं हिंदीमध्ये भाषांतर होऊ शकतं. एखादं वाक्य बोलून दाखवलं तरी त्याचं भाषांतर होऊशकतं.

✽ 'हिंदी-इंग्लिश ट्रान्सलेटर' हे ॲप इंग्रजीचा हिंदीत आणि हिंदीचा इंग्रजीत अनुवाद करायला मदत करतं.

ॲप वर्ल्ड

✽ 'इंग्लिश टू हिंदी ट्रान्सलेटर' हे ॲप ऑफलाईन वापरता येतं. या ॲपमध्ये हिंदी की बोर्ड देण्यात आला आहे. यात शब्दकोशही आहे.

✽ 'हिंदी-इंग्रजी डिक्शनरी'च्या मदतीने तुम्ही इंग्रजीतल्या वाक्यांचा हिंदीत अनुवाद करू शकता. इंग्रजी शिकण्यासाठी यात काही गेम्सही आहेत.

## मौल्यवान सोने

**सो**ने हा पृथ्वीवरील सर्वात सुंदर आणि मौल्यवान धातू मानला जातो. सोने पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या अनेक मीटर खाली आढळते. सोने जमिनीतून काढण्यासाठी आधी खडक फोडावे लागतात. त्या खडकात सोन्याचे अगदी छोटे कण असतात. खडकाची पावडर करून त्यावर पाणी सोडतात. सोने जड असल्यामुळे खाली बसते. याला 'पॅनिंग' किंवा धुण्याची पद्धत म्हणतात. मोठ्या खाणींमध्ये मशीनने खडक वेगळे करतात आणि रसायनांच्या मदतीने सोन्याचे कण वेगळे केले जातात. मिळालेले सोने पूर्ण शुद्ध नसते. त्यात चांदीसह अनेक इतर धातू मिसळलेले असतात. मिलमध्ये मोठे खडक आधी चिरडले जातात आणि नंतर पुन्हा पुन्हा फोडून बारीक पूड केली जाते. त्यात पाणी आणि सायनाईड मिसळून त्याचे



एक पातळ मिश्रण तयार केले जाते. हे मिश्रण मोठ्या टाक्यांमध्ये सोडले जाते. या चिखलातील जड कण खाली बसतात आणि द्रवापासून वेगळे केले जातात. ही द्रव सामग्री बाहेर काढली जाते आणि फिरणाऱ्या गोलाकार सिलिंडरवर सोडली जाते.

माहिती खनिजांची

मिश्रण पसरून हळूहळू बाष्पीभवन होते. त्यानंतर रसायनांच्या मदतीने अशुद्धता काढली जाते. शुद्ध सोने मिळवण्यासाठी ते अत्यंत उच्च तापमानावर तापवावे लागते. या सगळ्या प्रक्रियेनंतर उरलेले चमकदार सोने त्यापासून बार, नाणे किंवा दागिने बनवण्यासाठी वापरता येते. चांगल्या सोन्याच्या खाणीमधल्या १,००० किलो खडकाच्या पावडरमधून साधारण ६.५ ग्रॅम सोने मिळू शकते. भारतामध्ये सोने प्रामुख्याने कर्नाटक, आंध्र प्रदेश, झारखंड आणि राजस्थान या ठिकाणी मिळते. कर्नाटकातील कोलारमध्ये सध्या उत्खनन थांबले आहे. तसेच हिमालयाच्या काही भागात नद्यांमध्येही सोन्याचे लहान कण आढळतात.सोने खूप टिकाऊ असते. हवा, पाणी किंवा वेळ यामुळे त्याला गंज किंवा डाग लागत नाहीत.

## सांताक्लॉजची नवी गाडी

**डे**न्मार्कमधील क्रॅनॅक नावाच्या छोट्या बर्फाच्या शहरात एक दयाळू आजोबा राहत होते. ख्रिसमसच्या दिवशी सगळ्या शहाण्या मुलांना खाऊ आणि खेळणी नेऊन द्यायचे काम देवाने त्याच्याकडे दिले होते. लोक त्यांना सांता म्हणत. एका ख्रिसमसच्या रात्री सांताने आपली जादूची थैली भरली आणि ते निघाले. सांता गाडीत बसले. गाडीच्या घंट्या टुणटुण वाजल्या. पण गाडी हललीच नाही. सांता आजोबांनी खूप प्रयत्न केला. पण गाडी हलेना. आता सगळे काम कसे पूर्ण होणार याची त्यांना काळजी वाटू लागली. तेवढ्यात बर्फातून एक लहानसा निळा ढग खाली उतरला. त्याला दोन चमकदार डोळे आणि छोट्या पंखासारखी वाऱ्याची



पिसे होती. ढग म्हणाला, 'मी आहे विंडी. जादूचा ढग. माझ्या जादूच्या शक्तीने मी तुमची गाडी बदलून देतो!' विंडीने हळूच गाडीवर फुंकर मारली. सांतासमोर नवी जादूची गाडी उभी राहिली. या गाडीला घंटी नव्हती. पण तिच्या हँडलवर एक स्नोबनचा हसरा चेहरा होता. आकाशातले ढगांचे खड्डे आले की तो स्नोबन खुदुखुदू हसायचा. सांता म्हणाले, 'मला जगभर फिरायचे आहे आणि ते देखील एका रात्रीत.' विंडीने लहान लहान आठ चांदण्या घेतल्या. त्यांच्यावर हळूच फुंकर मारली. त्यांचे आठ रेनडिअर तयार झाले. 'हे आहेत जादूचे रेनडिअर. डॅशर, डान्सर, प्रान्सर, व्हिक्सन, कॉमेट, क्युपिड, डॉन्नर आणि ब्लित्झन. हे आकाशात उडू शकतात आणि जमिनीवर पण धावू शकतात. हे वाऱ्या सारखे वेगवान आहेत. मुलांना खाऊ आणि खेळणी वाटायचे तुमचे काम आता लगेच पूर्ण होईल. 'सांताने गाडी सुरू केली. रेनडिअर्सनी आकाशात झेप घेतली. गाडी आकाशात उडायला लागली. स्नो बन हसू लागला. सांता आपली गाडी त्या घराच्या छपरावर ठेवत. तिथल्या धुराडयातून हळूच खाली उतरत. मुलांच्या उशापाशी लटकावलेल्या मोज्यात सांता खाऊ आणि खेळणी ठेवत आणि आले तसेच गुपचुप बाहेर पडत. नव्या गाडीमुळे सांताचे काम चंद्र मावळायच्या आधीच पूर्ण झाले. तेव्हापासून सांता त्याच्या नव्या गमतीदार गाडीतून सगळीकडे फिरु लागले.

डेन्मार्कची लोककथा

## सेफ्टी मॅनेजमेंटमधील संधी

**दो**स्तांनो, आपलं आयुष्य खूप धोक्याचं आणि असुरक्षित झालं आहे. घर असो रस्ता असो किंवा मग कामाचं ठिकाण, आपल्याला अनेक धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यातच औद्योगिक क्षेत्रात अनेक अपघात होतात. हे अपघात टाळण्यासाठी सरकारने औद्योगिक क्षेत्रासाठी काही नियम आणि कायदे केले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा अधिकारी नेमणं बंधनकारक आहे. म्हणूनच सेफ्टी मॅनेजमेंट हे उत्तम करीअर होऊ शकतं. बारावी किंवा पदवीनंतर सेफ्टी मॅनेजमेंट विषयक अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. आरोग्य विज्ञान, औद्योगिक सुरक्षाविषयक नियम, अपघात थांबवण्यासाठीच्या उपाययोजना असे विषय




या अभ्यासक्रमाअंतर्गत शिकवले जातात. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी मेहनतीची तयारी, संवादकौशल्य, धैर्य, संयम, निर्णयक्षमता, प्रसंगावधान अशा कौशल्यांची गरज असते. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खाजगी तसंच सरकारी क्षेत्रात करीअर करता येतं. या पदाला खूप मान असतो. उद्योग, कारखान्याच्या सुरक्षेची जबाबदारी या अधिकाऱ्यावर असते. बीएससी इन सेफ्टी मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स इन फायर ॲंड सेफ्टी मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स इन फायर टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम तुम्ही निवडू शकता. अंगात धाडस असेल तर करीअरचा हा मार्ग स्वीकारायला हरकत नाही.

कोण होणार?

## रॉकी पर्वतरांगा

**रॉ**की पर्वतरांग ही कॅनडा आणि अमेरिका या दोन देशांत पसरलेली सर्वात प्रसिद्ध आणि विशाल पर्वतरांग आहे. ती साधारण ४८०० किलोमीटर लांबीची आहे. कॅनडामध्ये ती अल्बर्टा आणि ब्रिटीश कोलंबिया या प्रांतांतून तर अमेरिकेत कोलोराडो, वायोमिंग, मॉन्टाना, आयडाहो आणि न्यू मेक्सिको या राज्यांतून ही रांग पुढे पसरते.

इथली उंच शिखरे खूपच प्रसिद्ध आहेत. त्यात अमेरिकेतील माउंट एल्बर्ट, कॅनडातील माउंट रॉबसन, लॉंग्स पीक, पाइक्स पीक अशी अनेक उंच शिखरे येतात. येथील हवामान उंचीप्रमाणे बदलते. वरच्या उंच भागात बर्फ आणि खाली हिरवीगार अरण्ये आढळतात.

रॉकी पर्वतरांगेत अनेक सुंदर नद्या उगम पावतात. त्यात कोलोराडो नदी, कोलंबिया नदी, रिओ ग्रांदे, स्नेक नदी, मिसूरी नदी या अत्यंत महत्त्वाच्या नद्या येतात. तसेच रॉकी माउंटन नॅशनल पार्कमधील बेअर लेक, कॅनडातील लेक लुईस आणि मोराइन लेक हे मोठे तलावही प्रसिद्ध आहेत. खालच्या भागात पाईन, फर, स्प्रूस, सिडार, ओक, ॲनस्पन अशी भरपूर झाडे आहेत. उंच भागात बर्फ सहन करणारी टोकदार पानांची झाडे आढळतात. उन्हाळ्यात ही अरण्ये हिरवीगार दिसतात आणि शरद ऋतूमध्ये ऑस्पनची पिवळी पाने संपूर्ण पर्वत सोनेरी करतात. रॉकी पर्वतरांगेत अनेक वन्य प्राणीही राहतात. ग्रिझली अस्वल, काळी अस्वले, मूस, एल्क, पर्वतीय शेळ्या, लांडगे, कोल्हे आणि गरुड इथे दिसतात. उंच भागात छोटे पिका नावाचे बर्फात राहणारे प्राणीही आढळतात.

प्राचीन काळापासून काही आदिवासी जमाती इथे राहतात. त्यात शायेन, ॲछपाची, ब्लॅकफूट, यूट, क्रो, नझ पर्स अशा जमातींचा समावेश होतो. ते निसर्गाशी जुळवून जीवन जगतात आणि पर्वत, नद्या व प्राण्यांना पवित्र मानतात.

ओळख पर्वतांची

## बनवा तुमची स्टिरिओ सिस्टिम

**तु**मच्या लहान बहिणीला तुम्हाला काहीतरी द्यायचंय. काही तरी स्पेशल. स्वत: बनवलेलं. पण काय द्यावं हे सुचत नाहीये. मग एक सोपी आणि मस्त आयडिया आहे. घरातल्याच काही वस्तू वापरून तुम्ही एक स्टिरिओ सिस्टीम तयार करू शकता. तुमच्या बहिणीच्या भातुकलीसाठी किंवा डॉलहाऊससाठी ही एक छान भेट ठरेल.

**साहित्य** : चार रिकाम्या काडेपेट्या, एक मोठ्या आकाराची रिकामी काडेपेटी किंवा पुठ्ठ्याचा खोका, काळं स्केच पेन, करड्या (ग्रे) रंगाचा चार्ट पेपर, ॲल्युमिनिअम फॉइल, कात्री आणि गम

**कृती** :

✽ चार छोट्या काडेपेट्यांच्या दोन दोनच्या जोड्या करून एकावर एक आडव्या चिकटवा. या काडेपेट्यांवर ग्रे कागद गुंडाळा. हे तुमच्या स्टिरिओ सिस्टीमचे स्पीकर्स असतील.


✽ मोठ्या काडेपेटीवरही ग्रे कागद गुंडाळा. हा तुमच्या स्टिरिओचा डेक असेल.

✽ स्पीकर्सच्या बाहेरच्या बाजूला उजव्या आणि डाव्या कोपऱ्यात काळ्या स्केच पेननी दोन छोटी वर्तुळं काढा. ✽ मग ॲल्युमिनिअम फॉइलवर एक छोटं आणि मोठं वर्तुळ काढा आणि तो भाग कापून घ्या. या दोन वर्तुळांपैकी छोटं वर्तुळ स्पीकरच्या वरच्या बाजूला आणि मोठं खालच्या बाजूला लावा. अशाप्रकारे दोन्ही स्पीकर्सना वर्तुळं चिकटवून घ्या. ✽ मोठी काडेपेटी हा तुमचा मुख्य डेक. त्यावर काळ्या स्केचपेनने रेडिओच्या खुणा करा. तसंच कॅसेट प्लेअरचं चित्र काढून घ्या. सीडी प्लेअरचं चित्रही तुम्ही काढू शकता. तुमच्या घरचा डेक बघून तुम्ही हा खेळण्यातला डेक तयार करू शकता. ✽शेवटी मुख्य डेकला स्पीकर्स चिकटवा. झाली तुमची स्टिरिओ सिस्टिम तयार. आता ही छानशी भेट तुमच्या छोट्या बहिणीला द्या.

कार्यानुभव



ठिपके जुळवा



## ऐटबाज हत्ती


**दो**स्तांनो, तुम्ही छानसा हत्ती घरच्या घरी तयार करू शकता.



**साहित्य** : पातळ पुठ्ठा, कपड्याला लावायच्या पाच पिना, पाईप क्लिनर्स, गम, सजावटीच्या वस्तू, रंग

**कृती** : पुठ्ठ्यावर हत्तीचा आकार काढा. तसंच बदामाचा मोठा आकार त्याच पुठ्ठ्यावर काढा. बदामाचा आकार म्हणजे हत्तीचे कान आहेत हे लक्षात घ्या. यासाठी घरातल्या पुठ्ठ्याच्या बॉक्सचा वापर करता येईल. हत्ती आणि बदामाचा आकार कापून घ्या. बदामाच्या आकाराच्या मधोमध चीर द्या. या हत्तीच्या सोंडेच्या खालच्या बाजूला अशीच चीर द्या. आता हत्तीच्या शरीराला तुमच्या आवडीचा रंग द्या. कान तसंच चार पिनाही रंगवून घ्या. पाचव्या पिनेचा अर्धा भाग लाल रंगाने रंगवा तर अर्ध्या भागाचा रंग पिच असेल. हत्तीच्या पाठीवर झूल घाला. त्यासाठी एखादं कापड वापरता येईल. ग्लिटर पेन, खडे, स्टिकर्सचा वापर करून तुम्ही हत्ती सजवू शकता. तुमच्याकडे ज्या पिना आहेत त्यांच्यापासून हत्तीवर बसणारा राजा साकारायचा आहे. पिनांवर पाईक क्लिनर गुंडाळायचा आहे. राजाचे हात आणि पाय दिसतील अशा प्रकारे पाईप क्लिनर गुंडाळा. तसंच पिनेच्या वरच्या बाजूलाही पाईक क्लिनर गुंडाळा. हा पाईप क्लिनर म्हणजे राजाचा फेटा. हत्तीच्या शरीरावर आपण चीर दिली होती. तसंच बदामालाही चीर दिली होती. शरीराच्या चिरेत बदाम अडकवा. हे हत्तीचे कान आहेत. डोळ्यांचा आकार काढा किंवा गुगली आईज चिकटवता येतील. झाला तुमचा हत्ती तयार.

करून तर पहा



## 'एफ' कीजची कमाल

**मि**त्रांनो, तुम्ही कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप वापरत असाल. तुमच्या कॉम्प्युटरवर वरच्या बाजूला एफ १ ते एफ १२ या की असतात. हा कीज कशासाठी असतील, असा प्रश्न तुम्हाला पडत असेल. या एफ कीजचं नेमकं काम काय, याविषयी जाणून घेऊया...




✽ एखाद्या प्रोग्राममध्ये काम करत असताना मदत हवी असेल तर एफ १ ही की वापरता येईल. ही की दाबल्यावर 'हेल्प' विंडो ओपन होईल.

✽ एखाद्या फाईल किंवा फोल्डरचं नाव बदलायचं असेल तर ते सिलेक्ट करून एफ २ की दाबा. आता तुम्ही फाईलचं नाव बदलू शकता.

✽ कोणत्याही ॲपमध्ये सर्च ऑप्शन ओपन करण्यासाठी तुम्ही एफ ३ ही की वापरू शकता.

✽ एखादी विंडो बंद करायची असेल तर आल्ट प्लस एफ ४ ही की दाबा.

✽ विंडो किंवा प्रोग्राम रिफ्रेश करण्यासाठी एफ ५ की दाबा.

✽ तुम्हाला इंटरनेट ब्राउजरच्या ॲड्रेस बारमध्ये कर्सर न्यायचा असेल तर एफ ६ ही की वापरा.

✽ वर्डमध्ये काम करत असताना स्पेलिंग तसंच व्याकरण तपासायचं असेल तर एफ ७ ही की वापरा. कॉम्प्युटर ऑन करताना 'बूट' मेनूमध्ये जायचं असेल तर एफ ८ ही की दाबा.

✽ वर्ड डॉक्युमेंट रिफ्रेश करण्यासाठी एफ ९ कीचा वापर करता येईल.

✽ ॲपमधला मेनू बार ओपन करण्यासाठी एफ १० की वापरा.

✽ ब्राउजर फुल स्क्रीन करण्यासाठी किंवा त्यातून बाहेर पडण्यासाठी एफ ११ या कीचा वापर करता येईल.

✽ वर्डमध्ये काम करत असताना सेव्ह ॲज डायलॉग बॉक्स ओपन करण्यासाठी एफ १२ की दाबा.

स्मार्ट टिप्स

पर्सनल केअर

## कशी स्वच्छ करायची पाण्याची बाटली?

दोस्तांनो, आपल्या पाण्याच्या बाटलीत खूप बॅक्टेरिया असतात. बाटली नीट स्वच्छ केली नाही तर या बॅक्टेरियांमुळे आपण आजारी पडू शकतो. त्यामुळे शाळेत नेण्याची तुमची बाटली स्वच्छ असली पाहिजे. प्लास्टिकच्या बाटलीत सर्वात जास्त जंतू असतात. त्यामुळे ही बाटली आधी साबणाने स्वच्छ धुवून घ्यायला हवी. यामुळे बाटलीला येणारा वास निघून जाईल. वास गेला नाही तर चमचाभर ब्लीच आणि बेकिंग सोडा घालून बाटली स्वच्छ करा. ब्लीच आणि बेकिंग सोडा रात्रभर बाटलीत घालून ठेवा. त्यात पाणी भरा. सकाळी हलवून स्वच्छ करा.



सेफ्टी टिप्स...

## कसं राहायचं सुरक्षित?

सध्या लहान मुलांसोबत घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये खूप वाढ झाली आहे. त्यामुळे शाळेत किंवा घराबाहेर पडल्यावर विशेष काळजी घ्यायला हवी. लहान मुलांनी शक्यतो एकटं कुठेही जाऊनये. सोबत कोणाला तरी न्यायला हवं. अनोळखी माणसांशी बोलू नये. त्यांच्याकडून चॉकलेट, आईस्क्रीम किंवा कोणताही खाद्यपदार्थ घेऊनये. त्यांच्यासोबत कुठेही जाऊनये. शरीराला कोणी चुकीच्या पद्धतीने स्पर्श करत असेल तर आई-बाबांना लगेच सांगायला हवं. थोडी काळजी घेतली तर आपण नक्कीच सुरक्षित राहू शकू.



बी ॲलर्ट

## टॅटू काढण्याआधी...

मित्रांनो, आजकाल अनेक ठिकाणी टॅटू काढून मिळतात. टॅटू काढणारे रस्त्यांवरही असतात. पण टॅटू काढून घेताना सुरक्षेची काळजी घ्यायला हवी. टॅटूमुळे शरीरावर फोड किंवा ॲलर्जी होणार नाही हे पहायला हवं. इजिप्तमध्ये अशीच एक घटना घडली. एका सात वर्षांच्या मुलीने टॅटू काढून घेतला. पण हे प्रकरण तिला भलतंच महागात पडलं. तिच्या हातांवर पुरळ उठलं. फोड आले. टॅटू बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये घातक रसायनं असू शकतात. या रसायनांमुळे तुमच्या कोमल त्वचेला त्रास होऊ शकतो. त्यामुळे टॅटू काढण्याआधी सावध व्हा.



खादाडी

## फन फ्रूट कबाब्ज

मित्रांनो, नवरात्रीमध्ये अनेकांचे उपवास असतात. तुमच्या घरातही आई-बाबांचा उपवास असेल तर ही मस्त रेसिपी बनवता येईल. ही रेसिपी बनवण्यासाठी एक सफरचंद, एक केळं, लाल आणि हिरवी द्राक्षं, अननसाचे तुकडे, योगर्ट आणि किसलेलं सुकं खोबरं असं साहित्य घ्या. सगळी फळं नीट धुवून घ्या. त्यांचे छोटे चौकोन कापा. केळ्यांचे गोल आकार कापा. मोठ्या ताटलीत सगळी फळं ठेवा. किसलेलं खोबरं एका ताटलीत ठेवा. बारीक काठी घ्या. आईस्क्रीमच्या काड्या चालतील. या काडीत सगळी फळं अडकवा. तुमच्या कल्पनेप्रमाणे डिझाइन करा. आता काठीत अडकवलेली फळं योगर्टमध्ये बुडवा. आता ही फळं किसलेल्या खोबऱ्यावरून फिरवा. मस्तपैकी खा.



युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
रविवार दि.०४ जानेवारी २०२६

## केसलवाडा/वाघ येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**लाखनी :** तालुक्यातील केसलवाडा / वाघ येथील अंगणवाडी क्रमांक २ मध्ये दि.३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन अंगणवाडी सेविका पुष्पा ढेंगे व मदतनीस स्वाती लुटे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य व सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या महान कार्याची माहिती बालगोपालांना सोप्या शब्दांत सांगण्यात आली.



कार्यक्रमात बालगोपालांची लक्षणीय उपस्थिती होती. शिक्षणाचे महत्त्व आणि समानतेचा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

सावित्रीबाई फुले यांचा विचार बालवयापासून रुजविणे हीच खरी जयंती साजरी करण्याची भावना असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील सुसंवादातून भंडारा शहराचा विकास साधणार ! मधुरा मदनकर

■ मधुरा मदनकर यांनी स्विकारला भंडारा नगराध्यक्ष पदाचा पद्भार ■ आ.परिणय फुके यांची उपस्थिती

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** भंडारा नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर सौ. मधुराताई मिलिंद मदनकर यांनी पदभार स्वीकारताच शहराच्या विकासाला गती देण्यासाठी नगरपरिषदेत एका अत्यंत महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवून विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष सौ. मधुराताई मिलिंद मदनकर यांनी स्पष्ट केले की, शहराचा विकास हा नियोजनबद्ध आणि प्रभावी रितीने होणे गरजेचे आहे. बैठकीमध्ये पायाभूत सुविधांचा विकास, शहरातील



स्वच्छता, नियमित पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था आणि नागरी सुविधा यांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. तसेच, भविष्यातील विकासकामांचे प्राधान्यक्रम यावेळी निश्चित करण्यात आले.

नागरिकांनी नगरपरिषद निवडणुकीत आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो सार्थ ठरवण्यासाठी प्रशासन अधिक पारदर्शक आणि जबाबदार करण्याची ग्वाही यावेळी देण्यात आली. केवळ घोषणा न करता, समन्वय, नियोजन आणि सांघिक कार्य या त्रिसूत्रीच्या जोरावर भंडारा शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.प्रशास-ाकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील सुसंवादातून शहराची प्रगती निश्चितच साधली जाईल, असा विश्वास नगराध्यक्ष मधुराताई मदनकर यांनी व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण बैठकीला विद्यमान आमदार तथा माजी पालकमंत्री श्री. परिणयजी फुके, माजी जिल्हाअध्यक्ष भाजपा प्रकाश बाळबुधे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच भंडारा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जुम्मा प्यारेवाले हे देखील उपस्थित होते.

याप्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरसेविकांची उपस्थिती लक्षणीय होती. यामध्ये सौ.भाग्यश्री कलंबे, कुलप्रीत चड्डा, चंद्रकला भोपे, शिव-शंकर आजबले, रिता शैलेश मेश्राम, प्रिया खरोले, आशाताई ऊइके, निमिष डोकरीमारे, नितीन गायधने, वृषाली ब्राम्हणकर, रुपाली नेवारे, सचिन घनमारे, राजू व्यास, प्रिती ब्राम्हणकर, आशु गोंडाने, मंगेश वंजारी, प्रीती गाढ-वे, हाजी मुश्ताक (बल्ली), कु. अल्फीया अमीर शेख, हरिश्चंद्र मडावी, ललित जांभुळकर, भगवान बावनकर, ज्योती हरीश मोगरे, कमल साठवणे, गजानन बादशहा, राजू धुर्वे, लक्ष्मी भागवत, विनोद चवरे, ऋतुजा पडोळे, पूजा कुंभलकर, शुभांगी खोब्रागडे, उमाताई घोगरे, सो. हाजी अक्तरी बेगम, उषा नंदनवार आणि सुनीता उपरीकर यांचा समावेश होता.

## पोस्ट ऑफिसमध्ये मनमानी कारभार

◆ अल्पबचत प्रतिनिधी त्रस्त
◆ ऑफिस प्रमुखांविरोधात तक्रार

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** शासनाच्या वतीने सामान्य नागरिकांना सुलभ आर्थिक सेवा देण्यासाठी सुरू केलेल्या टपाल खात्याच्या योजनांमध्ये काही ठिकाणी मनमानी कारभारामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. आंधळगाव पोस्ट ऑफिसमधील कारभाराबाबत नागरिक आणि अल्पबचत महिला प्रतिनिधींनी नागपूर ग्रामीण विभागाचे प्रवर अधीक्षक व तुमसर येथील उपविभागीय ढाक निरीक्षक या अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

आंधळगाव पोस्ट ऑफिसच्या अधिकारी मनीषा वडगांवकर यांच्या कार्यपद्धतीमुळे नागरिकांना नियमित कामासाठी त्रास सहन करावा लागतो. कार्यालयीन वेळेचे पालन न करणे, ग्राहकांशी उद्धट वागणूक देणे, सेवा देण्यास टाळाटाळ करणे, मुदत ठेव व बचत योजनेत गुंतवणूक करणाऱ्या ग्राहकांना परत पाठवणे, तसेच सुकन्या समृद्धी खातेदारांना मोबाईलवर पैसे भरण्यास सांगून पासबुक न प्रिंट करणे यासारख्या आरोपांची नोंद आहे.

**चौकशीची मागणी :** पोस्ट ऑफिसमधील मनमानी कारभाराची वरिष्ठ पातळीवर प्रत्यक्ष चौकशी करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. दोषींवर कडक कारवाई करून नागरिक व प्रतिनिधींना योजनांचा सुरळीत लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**वरिष्ठांकडे तक्रार :** अल्पबचत प्रतिनिधींनी आंधळगाव पोस्ट ऑफिसमधील अधिकाऱ्या विरोधात गौरीशंकर खोकले, अनुपमा बुराडे, शेवंता सोनकुसरे, राजकन्या धूमनखेडे, दशरथ गायधने, प्यारेलाल दमाहे, नलिनी धूमनखेडे, सुनिता ढेंगे, अनुपमा धांडे, रेखा नाईक, गीता पाटील, इंदू सातपुते आदींनी तक्रार दाखल केली आहे.

## सुधा श्यामसुंदर वर्मा यांचे निधन



**भंडारा :** समाजिक कार्यकर्ते अतुल वर्मा (ग्रामसेवा कॉलोनी, खात रोड) यांची आई सुधा श्यामसुंदर वर्मा(८८ वर्ष) यांचे २ जाने. २०२६ ला रात्री १०.०० वाजता निधन झाले. त्यांचेवर अंतिम संस्कार ०३ जानेवारी २०२६ ला दुपारी १.०० वाजता वैनगंगा घाट भंडारा येथे करण्यात आले. त्यांचे मागे ४ मुले आणि १ मुलगी असा आप्त परिवार आहे.

# शहराच्या सर्वांगीण विकासाकरीता प्रामाणिक प्रयत्न करणार : देवश्री कापगते

साकोली नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा देवश्री कापगते यांचा पदग्रहण संपन्न



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** साकोली-सेंदूरवाफा नगर परिषदेच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीत भाजपाकडून नवनिर्वाचित झालेल्या नगराध्यक्षा देवश्री मनिष कापगते यांचा पदग्रहण सोहळा शनिवारी नगरपरिषद कार्यालयात उत्साहात पार पडला. या सोहळ्याला शहरातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नगरपरिषदेत नव्या पर्वाची सुरुवात होत असल्याचे वातावरण या वेळी दिसून आले.

पदग्रहणानंतर उपस्थितांना संबोधित करताना नगराध्यक्षा देवश्री कापगते म्हणाल्या की, 'हा माझा वैयक्तिक विजय नसून साकोली- सेंदूरवाफा शहरातील जनतेचा विजय आहे. शहराचा खरा, पारदर्शक आणि सर्वसमावेशक कायापालट करण्याची मी ग्वाही देते.' आपण सत्यनिष्ठ माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते यांच्या सून असल्याचा अभिमान व्यक्त करत, हे आपले सौभाग्य असल्याचे त्यांनी नमूद केले. जनतेने दिलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पदग्रहण सोहळ्याला आमदार डॉ. परिणय फुके, अविनाश ब्राम्हणकर, भाजप जिल्हाध्यक्ष आशू गोंडाने, माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते, प्रकाश बाळबुद्धे, मुख्याधिकारी मंगेश वासेकर, डॉ. नेपाल रंगारी, माहेश्वरी नेवारे, रेखा भाजीपाले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप गोमासे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. मनिष कापगते यांनी केले. यावेळी आमदार डॉ. परिणय फु-के यांच्या हस्ते नगराध्यक्षा देवश्री कापगते यांच्यासह नवनियुक्त नगरसेवक व नगरसे-विका रोहिणी मुंगूलमारे, किशोर पोगळे, इंजि. सपन कापगते, इंजि. संदीप बावनकुळे, राजकुमार पोगळे, रेणू गणवीर, प्रमोद गजभिये, नयन पटेल, विवेक बैरागी, पंकज मुंगूलमारे, पुष्कर करंजेकर, त्रिवेणी चौधरी, मेघा बडवाईक, वैशाली लांजेवार, मीना लांजेवार, स्मिता सिडाम, कुणाल राऊत, प्रीती डोंगरवार, डॉ. सायली दोनोडे व निर्मला नंदेश्वर यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. या सोहळ्यामुळे नगरपरिषदेच्या नव्या कार्यकाळाबाबत शहरात आशा व अपेक्षांचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विद्यार्थ्यांना बस सेवा नियमित द्या !

## पालक संघाचे निवेदन,आंदोलनाचा इशारा



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सिहोरा :** विद्यार्थ्यांना बसेसची सेवा वेळेवर व नियमित पुर-विण्यात यावी अन्यथा आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा विद्यार्थी पालक संघाचे अध्यक्ष गजानन निनावे यांनी तुमसर एसटी महामंडळाचे शाखा व्यवस्थापक व आमदार राजू कारेमोरे यांना एका निवेदना अन्वये दिला आहे.

राज्य शासनाने मानव विकास योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोयीचे होईल या दृष्टीने अहिल्याबाई होळकर ही योजना लागू करून एसटी महामंडळ तुमसर डेपोच्या वतीने फ्री पासची व्यवस्था करण्यात आली आहे. आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, महाराष्ट्र हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा परिषद हायस्कूल, संजय गांधी पूर्व माध्यमिक शाळा व आर्ट्स कॉलेज सिहोरा येथे मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी ग्रामीण भागातून येतात.

सिहोरा ही ४० ते ४५ गावाची बाजारपेठ असून येथे विद्यार्थी व विद्यार्थिनी स. ७ ते सा. ६ वाजेपर्यंत शिक्षण घेतात परंतु विद्यार्थ्यांचे दुर्दैव की एसटी महामंडळाची बस तुमसर डेपोतून वेळेवर व नियमित येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यात काही गावांपैकी काही गावे वनपरिक्षेत्रा लगत असल्यामुळे व बसेस वेळेवर येत नसल्यामुळे शाळेतील विद्यार्थी आपल्या गृह गावी वेळेवर पोहोचत नाही. पालक वर्गासाठी हा चिंतेचा विषय ठरला आहे. काही पालक वर्गाने तुमसर डेपोसी संपर्क साधला असता त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नसल्यामुळे त्यांच्या मनात असंतोष खदखदु लागला आहे. विद्यार्थी शाळेत व शाळेतून घरी वेळेवर पोहोचू शकत नसल्यामुळे त्यांचा अभ्यासावर सुद्धा परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.या संदर्भात शिक्षण विभाग व पालक वर्गाने अनेक वेळा निवेदन दिले परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

सदर निवेदनावर तुमसर एसटी महामंडळाचे व्यवस्थापक,तुमसर विधानसभा क्षेत्राचे आमदार राजू कारेमोरे, विद्यार्थी पालक संघाचे अध्यक्ष गजानन निनावे,सचिव मोतीलाल ठवकर, संजय नावकर व दिनेश तुरकर यांच्यात झालेल्या चर्चेअंती १५ दिवसाच्या आत बस सेवा वेळेवर व नियमित पुरविण्यात येईल असे आश्वासन

## महात्मा ज्योतिबा फुले मार्केट मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** महात्मा ज्योतिबा फुले मार्केटमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला मार्केटचे अध्यक्ष महेंद्र मेंढे, उपाध्यक्ष कृष्णा उपरीकर, शेखर बाईक, आसिफ भाई, सुरज गायधने, सुरज साखरकर यांच्यासह महात्मा ज्योतिबा फुले मार्केटमधील सर्व व्यापारी व कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर उपस्थितांनी विचार मांडले. त्यांच्या कार्यातुन प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## नवीन वर्षाच्या प्रारंभी चांदपूर हनुमान मंदिरात महाप्रसादाचे वाटप

### भाविकांची मांदियाळी




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**नाकाडोंगरी :** नूतन वर्षाचे स्वागत आध्यात्मिक वातावरणात आणि सेवाभावाने करण्याच्या परंपरेनुसार, तुमसर-मोहाडी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस अ.प गटाचे लोकप्रिय आमदार राजूभाऊ कारेमोरे यांच्या वतीने प्रसिद्ध तीर्थक्षेत्र चांदपूर हनुमान मंदिर येथे भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. 'एकच भाऊ, राजूभाऊ' या नावाने जनमानसात ख्याती असलेल्या आमदारांच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी चांदपूर येथील जागृत हनुमान देवस्थानात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या निमित्ताने आमदार का-रेमोरे यांनी स्वतः उपस्थित राहून भाविकांना महाप्रसाद वितरित केला आणि त्यांच्याशी संवाद साधून नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाप्रसंगी तुमसर पंचायत समितीचे माझी उपसभापती शिशुपाल गोपाले, नाकाडोंगरीचे सरपंच सुमित गोपाले आणि रामेश्वर नागपुरे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सेवाभावातून नवीन वर्षाची सुरुवात

आ. राजूभाऊ कारेमोरे हे नेहमीच आपल्या मतदारसंघातील धार्मिक आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. "नवीन वर्षाची सुरुवात हनुमंताच्या आशीर्वादाने आणि जनतेच्या सेवेने व्हावी, या उद्देशाने या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले," अशी भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. चांदपूर परिसरात या उपक्रमामुळे दिवसभर उत्साहाचे वातावरण होते.

## पटेल महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी:** स्थानीक नटवरलाल जशभाई पटेल कला वाणिज्य महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. सु-रेंद्र पवार यांनी माल्यार्पण केले. प्राचार्य डॉ.पवार यांनी सा-वित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाची माहिती दिली. यावेळी डॉ.प्रमोद वरकडे,अनिल चकोले, राहुल हेडाऊ,अभय उज्जैनवार तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# लाखनी येथे ११ जानेवारीला शासकीय योजनांचा महामेळावा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जानेवारी २०२६ रोजी लाखनी येथे नागरिकांसाठी शासकीय सेवा व योजनाचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा भंडारा जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी सावन कुमार, पोलीस अधीक्षक नुरुल हसन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलींदकुमार साळवे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्यास नागरिकांनी उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेश अस्मर यांनी केले आहे.

जिल्हा न्यायालय येथे आयोजित महामेळावासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी लिना ढेंगे-फलके व प्राधिकरणाचे सचिव तथा वरिष्ठ न्यायाधीश मिलिंदकुमार बुराडे व इतर न्यायाधीश तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर यांच्या अध्यक्षतेखाली हा महामेळावा होणार असून महामेळाव्याचे उद्घाटन ११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता होईल. महामेळावा सकाळी १०.३० ते दुपारी ४ या कालावधीत होणार आहे.

महामेळाव्यात शासनाचे विविध विभाग व कार्यालये सहभागी होतील. ते जनतेस विविध शासकीय योजनांचा माहिती देतानाच या योजनांचा लाभही देतील.

# केसलवाडा ग्रा.पं.मध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** तालुक्यातील ग्राम पंचायत कार्यालय केसलवाडा येथे ग्राम पंचायत सभागृहात आज दि.३ जानेवारी रोजी सा-वित्रीबाई फुले यांचा जयंती कार्यक्रम सरपंच जयराम (आशु) वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

यावेळी क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी ग्राम पंचायत उपसरपंच भावना बागडे यांच्यासह ग्राम पंचायत सदस्य सर्वश्री शोभा देवेकर,आरती रंगारी, कृतिका हत्तीमारे,सुनंदा बडवाईक, तंटामुक्ती समिती अध्यक्ष-वसंत भुरे आदि उपस्थित होते.

यावेळी सरपंच जयराम वंजारी यांनी अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करतांना सा-वित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांनी विवाहानंतर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सहकार्याने स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. त्या केवळ पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर समाजातील महिलांना शिक्षणासाठी प्रेरणा देणाऱ्या एक महान समाजसुधारक होत्या. आज अनेक महिला उच्च पदांवर कार्यरत आहेत यामागे सा-वित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय कार्याचे मोठे योगदान आहे, असे त्यांनी नमूद केले

यावेळी ग्रा.पं.सदस्या शोभा देवेकर यांनी सावित्रीबाई यांचे जीवनावर मार्गदर्शन करतांना ' विद्या विना मती गेली, !मती विना नीती गेली, ! नीती विना गती गेली,! गती विना वित्य गेले! आणि इतका अनर्थ एका अविध्येने केले!' असे सांगत माणसाच्या जिवनात शिक्षणाचे महत्व विषद केले.

कार्यक्रमाचे संचालन रोशन उरकुडे यांनी केले.तर ग्रामपंचायत अधिकारी सतीश सेलोकर यांनी आभार मानून, कार्यक्रमाची समारोप करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिपाई सचिन आकरे, निखिल भुरे,व रोशन घाटबंधे यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी केसलवाडा गावचे प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक संघटनाचे पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या.

युवाराष्ट्र दर्शन
वर्धा जिल्हा
रविवार, ०४ जानेवारी २०२६




# रब्बी हंगामात सरासरी क्षेत्राच्या तुलनेत १०० टक्के पेरणी पूर्ण

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०३**

जिल्ह्यातील शेतकरी रब्बी हंगामात ज्वारी, गहू, चना या पिकासोबतच जवस, मसूर व इतर पिकाची लागवड करीत असतात. जिल्ह्यात रब्बी हंगामात १ लाख १४ हजार ७६४ हेक्टर २१ आर क्षेत्र असून १ जानेवारी २०२६ पर्यंत १ लाख १६ हजार ६५१ हेक्टर ९३ आर क्षेत्रावर तृणधान्य, कडधान्य, व गळीतधान्य पिकांची रब्बी हंगामासाठी प्रत्यक्ष पेरणी झालेली आहे. प्रत्यक्ष पेरणी १०१ टक्के झाली आहे.

रब्बी ज्वारीचे सरासरी क्षेत्र १ हजार २९१ हेक्टर ६६ आर असून प्रत्यक्ष ७३३ हेक्टर ३० आर क्षेत्रावर म्हणजेच ५६.७७ टक्के लागवड झालेले आहे. तर गहू पिकाचे सरासरी क्षेत्र ४० हजार ६६९ हेक्टर २९ आर असून प्रत्यक्ष ३३ हजार १८ हेक्टर ६५ आर क्षेत्रावर ८१.१९ टक्के लागवड झालेली आहे. हरभराचे सरासरी क्षेत्र ७२ हजार १०२ हेक्टर ४३ आर असून प्रत्यक्ष ८२ हजार ९० हेक्टर ४१ आर क्षेत्रावर ११३.८५ टक्के लागवड झालेली आहे. इतर कडधान्याचे सरासरी क्षेत्र ४७० हेक्टर ८० आर असून यामध्ये प्रामुख्याने मसूर पिकाची २०५ हेक्टर ३० आर क्षेत्रावर ४३.६१ लागवड झालेली आहे. तर जवस पिकाचे लागवडीचे सरासरी क्षेत्र ७ हेक्टर असून ७३ हेक्टर ५० आर क्षेत्रावर १०५० टक्के लागवड झालेली आहे. अशी एकुण रब्बी पिकाचे सरासरी पेरणी क्षेत्रानुसार १ जानेवारी २०२६ अखेर १ लाख १६ हजार ६५१ हेक्टर ९३ आर क्षेत्रावर १०१.६४ टक्के लागवड तृणधान्य, कडधान्य, व गळीतधान्य पिकांची रब्बी हंगामासाठी प्रत्यक्ष पेरणी झालेली आहे.

# सिंदी (रेल्वे) प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा द्यावा

## भजन आंदोलनातून प्रशासनाला इशारा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सिंदी (रे), दि. ३**

येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा द्यावा, या मागणीसाठी सिंदी (रेल्वे) शहर व परिसरातील नागरिक रस्त्यावर उतरले. वस स्टँड चौकातील प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर भजन आंदोलनाच्या माध्यमातून संतप्त जनतेने लढा उभारला.

परिसरातील हजारो नागरिकांसाठी हे एकमेव आरोग्य केंद्र असतानाही आजही ते प्राथमिक स्वरूपातच उपचार होत असल्याने गंभीर रुग्णांना नागपूरकडे हलवण्याची वेळ येते, ही मोठी शोकांतिका असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. शासन विकासाच्या गप्पा मारते; मात्र सिंदीच्या आरोग्य सुविधांकडे डोळेझाक केली जात असल्याचा संताप आंदोलनातून व्यक्त करण्यात येत आहे.



### रुग्णालय हा आमचा हक्क आहे – भीक नाही !

कोट्यवधींचा निधी इतरत्र खर्च होतो, पण सिंदीच्या रुग्णालयासाठी नाही का? असा थेट सवाल प्रशासनाला विचारण्यात आला आज भजन आंदोलन असले तरी, उद्या मोठे जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशाराही यावेळी देण्यात आला. आंदोलन शांततेत पार पडले; मात्र जनतेच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, असा सूर सर्वत्र होता. विविध सामाजिक संघटना, युवक, महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होण्याची विनंती करण्यात आली असून सिंदी (रेल्वे)ला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळेपर्यंत लढा थांबणार नाही, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

## अपंगाला आ. कुणवार यांच्या हस्ते सायकल वाटप

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. ३**

येथील विदर्भ नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे नववर्षाच्या सुरुवातीला आ. समीर कुणवार यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून यांच्या हस्ते येथील शिवाजी वॉर्डातील रहिवासी अपंग हेमंत देवीदास कुमरे यांना तीनचाकी वॉर्डातील रहिवासी अपंग हेमंत देवीदास कुमरे यांना तीनचाकी सायकलचे वाटप करण्यात आले, विदर्भ नागरी सहकारी पतसंस्था नेहमी गरजूहोतकरु दिनदुबळ्या लोकांकरिता साहित्य वाटप करण्यात नेहमी अग्रेसर असते, असे उदगार आ. समीर कुणावार यांनी काढले, याप्रसंगी विदर्भ मर्चटस अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन गोयनका, उपाध्यक्ष डॉ. अशोक मुखी, श्रीचंद कोचर, विदर्भ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रवीण सुराणा, उपाध्यक्ष विजय राठी, संचालक शांतीलाल कोचर, जयप्रकाश सारडा, विजय अग्रवाल, विजय रानपारा, तसेच व्यवस्थापक अनिल शेगोकार तथा कर्मचारी, नवनिर्वाचित नगरसेवक दिनेश वर्मा व सामाजिक कार्यकर्ते संदीप मोहता उपस्थित होते.

# टिप्परसह वाळूसाठा जप्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सिंदी (रेल्वे) :** महसूल विभागाने वायगाव बैलमारे शिवारात वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करीत वाळूसह १२ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, याप्रकरणी सचिन बुचके रा. पारडी आणि प्रमोद निमसडे रा. भोसा यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे, मंडळ अधिकारी प्रशांत निनावे यांना वाळूची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती, त्यावरुन वायगाव बैलमारे शिवारात एम. एच. ३६, एफ. १४६९ या क्रमांकाच्या टिप्परची पाहणी केली असता त्यात वाळूसाठा आढळून आला, या प्रकरणी सिंदी पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# कार्मेल विद्यालयात सावित्रीबाई फुले व संत चावरा जयंती साजरी

**वर्धा** - सावित्रीबाई फुले यांनी महिलांकरीता पहिली मुलींची शाळा १४४८ साली सुरू करून महिलां करिता शिक्षणाची संधी निर्माण करून दिली सावित्रीबाई फुले पहिल्या महिला शिक्षिका, सुधारक होत्या, त्यांनी ज्योतिबा फुले सोबत



स्त्री शिक्षणाचे व सामाजिक समानतेचे कार्ये केले तसेच संत चावरा यांनी सुद्धा सन १८४६ साली पहिली संस्कृत भाषेतील शाळा केरळ येथे सर्व समाजातील मागास व्यक्तींकरीता सुरू करून शिक्षणाची दारे उघडली, असे विचार कार्मेलच्या मुख्याध्यापिका सिस्टर रिणी यांनी व्यक्त केले.

३ जानेवारी रोजी कार्मेल गतिमन्द विद्यालयात संत चावरा व सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी त्या बोलत होत्या. या प्रसंगी अतिथि म्हणून सिस्टर रीनी मुख्याध्यापक व सिस्टर अनुपा होत्या ,कार्यक्रमाचे संचालन डॉ नरेंद्रकुमार कांबळे यांनी केले तर आभार राजू वाघमारे यांनी मानले, कार्यक्रमाच्या येशस्वीते करीता सिस्टर मारिया, सिस्टर अनुग्रहा, दशरथ गवळी, यांनी सहकार्य केले.

## शिरपूर शिवारात मारहाणीत एक जखमी

**वर्धा, :** आर्वी तालुक्यातील शिरपूर शिवारात शेतातील पिकात बैल चारल्याच्या आरोप करत मारहाण करण्यात आली, ही घटना १ जानेवारी रोजी घडली,

या प्रकरणी आर्वी पोलिसांनी तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला, शिरपूर येथील पुरवेश ठाकरे शेतात गेला असता सदाशिव डांगे यांच्यासोबत बोलत होता, दरम्यान, रामेश्वर दुर्गे याने शेतात बैल सोडल्याचे म्हणत पुरवेश ठाकरे यास मारहाण केली, आर्वी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# सनशाईन स्कूल येथे नववर्ष कॅलेंडरचे लोकार्पण

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**कारंजा (घा.), दि. ३**

सनशाईन स्कूल, कारंजा येथे नववर्षाच्या निमित्ताने संस्था सचिव विजय ठाकरे यांचे संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या कॅलेंडरचेलोकार्पण संस्थाध्यक्ष प्रेम महिले यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी बोलतांना प्रेम महिले यांनी सांगितले की सनशाईन स्कूलचा प्रत्येक विद्यार्थी हा भविष्यातील उज्ज्वल भारताचा शिल्पकार आहे, या विश्वासाने आम्ही सदैव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहोत.हे कॅलेंडर पाहताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात'मीही असे यश मिळवू शकतो'हा आत्मविश्वास निर्माण व्हावा, हाच खरा हेतू आहे.'हे कॅलेंडर केवळ दिनदर्शिका नसून विद्यार्थ्यांच्या मेहनतीची ओळख आणि यशस्वी वाट चालीचे



प्रेरणास्थान ठरत आहे.यावेळी नगर पंचायत कारंजा बांधकाम सभापती हेमंत बन्नगरे, पर्यवेक्षक पवन ठाकरे, जेष्ठ शिक्षिका संगीता चांगले, ममता दिवाणे, शालिनी गोरे, पुष्पा एकापुरे, संगीता ढोले तसेच समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.या नववर्ष कॅलेंडरमध्ये इयत्ता १० वीचे गुणवंत विद्यार्थी, विविध व्यावसायिक क्षेत्रात यश संपादन केलेले माजी विद्यार्थी, शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा, सायन्स ऑलिमपियाडमध्ये प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी तसेच विभाग स्तरावर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला आहे. कॅलेंडर प्रकाशनासाठी विरबा मार्टचे संचालक दिनेश रायचुरा तसेच साई अंब्रोसिया कॉम्प्युटर चे संचालक रमाकांत दळवी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक केले.

# होमगार्ड वर्धापण दिन सप्ताह साजरा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ३**

होमगार्ड व नागरी संरक्षण दलाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन सप्ताह साजरा करण्यात आला.

होमगार्ड संघटनेचे काम अतुलनिय असून होमगार्डनी रक्तदान करुन रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी मोलाची कामगिरी केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १०० टक्के होमगार्डची पुर्तता होत असते. भविष्यात अशाच प्रकारे कार्य करुन होमगार्ड संघटनेने आपले नाव आणखी उज्वल करावे, असे सदाशिव वाघमारे यांनी सांगितले.

होमगार्ड संघटनेची स्थापना ६ डिसेंबर १९४६ साली



मुंबई शहरात झाली. जनतेतून जनतेचे संरक्षण करण्यासाठी व कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी होमगार्ड संघटनेच्या जवानाकडून पोलिस यंत्रणेला भरभरुन मदत होत असते. मुंबई शहरात होमगार्ड संघटनेची स्थापना मोरारजी देसाई यांनी केली व आज या छोट्याशा रोपट्याच रुपांतर वटवृक्षामध्ये झाले.

संघटना देशपातळीवर कार्य करती आहे. ही गौरवाची बात आहे, असे सदाशिव वाघमारे म्हणाले.कार्यक्रमाप्रसंगी वरिष्ठ पलटन नायक बाबा तुरक यांनी राष्ट्रपतीच्या संदेशाचे वाचन केले. तसेच सन २०२५ मध्ये सेवानिवृत्त झालेले मानसेवी अधिकारी मधुकर बागेश्वर, सुरेश कोपरकर, उमेश काबंळे, रेखा मानवटकर यांचा सत्कार करण्यात आला.

हिंगणघाट पथकातील समादेशक अधिकारी कैलास रोकडे यांच्या नेतृत्वात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. योग प्रशिक्षक वसंतराव पाल यांनी उत्तमप्रकारे होमगार्डना योग शिकवून सुदृढ आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप बलवीर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रनायक प्रमोद वानखेडे, प्रशासकिय अधिकारी संजय सुराशे, पलटन नायक प्रदीप बलवीर, अनंत गजबे, समादेशक अधिकारी हेमलता कांबळे, कैलास रोकडे, मनोहर ढवळे, फिरोजखान पठाण, चंद्रकांत पिंजरकर, वसंत नाईक, गजानन ससाने, नितीन शेंडे, चंद्रशेखर शेलकर, सारीका चामटकर, रंजना करपाते यांनी प्रयत्न केले.

### ७० पुरुष व ३५ महिला होमगार्डचे प्रशिक्षण

सप्ताहादरम्यान ७० पुरुष होमगार्ड व ३५ महिला होमगार्डचे प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच पथसंलनाचे आयोजन करुन जिल्हा होमगार्ड समादेशक यांना सशस्त्र मानवंदना देण्यात आली. यावेळी होमगार्ड संघटनेच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २२ पुरुष व महिला होमगार्डनी रक्तदान केले. होमगार्डच्यावतीने लक्ष्मीनगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यासाठी नगर सेवक विलास आगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# वर्धेत साकारणार उमेदचा मॉल

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०३**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद अंतर्गत कार्यरत महिलांच्या स्वयं सहाय्यता गटामार्फत निर्मित वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी, यासाठी वर्धेत उमेद मॉल साकारण्यात येणार आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नांमुळे वर्धेतील महिला बचत गटांना नववर्षाच्या सुरूवातीला ही अनोखी भेट मिळाली आहे.

जिल्ह्यात बचत गटाची चळवळ सक्षमपणे उभी झाली आहे. महिलांना बचत गटांच्या माध्यमातून रोजगार व स्वयं रोजगाराची कास धरली आहे. उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्हयात १४ हजार ३०९ स्वयं सहायता समूह, ९५२ ग्रामसंघ व ४९ प्रभाग संघ कार्यरत आहे. समूहातील ग्रामीण महिलांव्दारे १२ हजार ३१० वैयक्तिक व १६५ सामूहिक व्यवसाय सुरू करण्यात आले आहे. उदयोजक महिलांव्दारे निर्मित वस्तुंच्या विक्री व ब्राडिंगसाठी वर्धिनी ब्रँड विक्रीस उपलब्ध करून देण्यात आला आहे. वर्धिनी ब्रँडचे ब्रँडिंग व पॅकेजिंग करून उमेद मार्ट, फ्लपकार्ट, ॲमेझान यासारख्या विविध माध्यमातून विक्रीस उपलब्ध करून देण्यात आले. परंतु समूहांना हक्काची जागा नसल्याने उमेद अभियानातंर्गत हक्काची जागा व मॉल देण्यात यावा, अशी मागणी आमदार डॉ. पंकज भोयर यांनी १० ऑक्टोबर २०२२ रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. तसेच राज्य पुन्हा सत्ता आल्यानंतर १ ऑगष्ट २०२५ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन देऊन मागणी केली होती. नुकताच शासनाने उमेद अभियानातंर्गत जिल्हा मुख्यालय स्तरावर मॉल बांधण्याचा निर्णय घेतला. त्याअनुषंगाने पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले होते. पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यामध्ये उमेद मॉल बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये वर्धेचा समावेश करण्यात आला आहे. नागपूर विभागातून वर्धा व नागपूर येथे हा मॉल उभारण्यात येत आहे.

### मगन संग्रहालय जवळ निर्माण होणार उमेद मॉल

शहरातील बॅचलर रोड वरील मगन संग्रहालय जवळ जिपच्या मालकीची जवळपास १० हजार स्के.फूट जागा आहे. या जागेवर मॉलची निर्मिती केली जाणार आहे. मॉलमुळे महिलांना त्यांची उत्पादने विक्री करण्यासाठी हक्काची जागा मिळणार आहे.

### बचत गटांनी दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादने निर्मिती करावी



जिल्ह्यातील बचत गटांचे काम उल्लेखनीय आहे. त्यांनी तयार केलेली उत्पादने चांगल्या दर्जाची असली तरी पॅकेजिंग व ब्राडिंग मध्ये महिला मागे राहतात. महिलांना हक्काची बाजारपेठ मिळावी, यासाठी सतत प्रयत्न राहिले आहे. आता नवीन वर्षात राज्य शासनाने उमेद मॉल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्या वर्धेचा देखील समावेश आहे. महिलांसाठी ही आनंदाची बात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला आहे. उमेद मॉल मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानतो.

**डॉ. पंकज भोयर पालकमंत्री वर्धा जिल्हा**

# सावित्रीबाई स्त्री शिक्षण क्रांतीच्या प्रेरणास्रोत - डॉ. ससनकर

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०३**

सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करुन महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा घडवून आणत 'स्त्री' स्वाभिमान जागृत करण्याचे महान कार्य केले. समाजाचा विकास घडवून आणायचा असेल तर प्रथमतः समाजातील रूढी परंपरा नष्ट कराव्या लागतील. यासाठी सर्वप्रथम 'स्त्री' यांच्या जीवनात परिवर्तन घडविणे आवश्यक आहे. हे ओळखून सावित्रीबाईनीं मुलींच्या शिक्षणाकरिता शाळा काढली व त्यांच्या सर्वांगीन विकासाचा मार्ग प्रशस्त केला. सावित्रीबाई च्या मते शिक्षण हाच खऱ्या अर्थाने जीवनाचा दागिना आहे, असे मत प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी व्यक्त केले.



स्थानिक इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. आशिष ससनकर, प्रमुख उपस्थिती डॉ. प्रशांत कडवे, डॉ. ज्ञानेश्वर बोहरूपी, डॉ. वैभवी उघडे, प्रा. भारती येरणे, प्रा. तेजस्विनी इंगोले होते. पुढे प्राचार्य ससनकर म्हणाले की, आजच्या तरुण मुलामुलींनी आद्य स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा आदर्श समोर ठेवून आपले जीवन यशस्वीरित्या घडवावे, असे सांगितले.याप्रसंगी इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रशांत कडवे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. संचालन प्रा. प्राजक्ता गावंडे यांनी केले. प्रा. अर्चना तिखट यांनी आभार मानले.

# स्कोडा ऑटोच्या २५व्या वर्धापनदिनी ७२,६६५ कार विकल्या

**नागपूर , ३ जानेवारी २०२६ :** स्कोडा ऑटो ने आतापर्यंतच्या भारतातील प्रवासात २०२५ हे आपले सर्वात निर्णायक वर्ष म्हणून ठरवले. त्यांनी देशात त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मजबूत विक्री कामगिरीसह आपला २५ वा वर्धापनदिन साजरा केला. या ब्रँडने २०२५ मध्ये ७२,६६५ कारांची विक्री करून वर्ष समाप्त केले, जे २०२४ मध्ये विकलेल्या ३५,१६६ युनिट्सच्या तुलनेत १०७ टक्के वार्षिक वाढ दर्शवते. या असाधारण कामगिरीमुळे २०२५ हे स्कोडा ऑटो इंडियाचे आतापर्यंतचे सर्वात मोठे वर्ष ठरले आहे, जे उत्पादने, बाजारपेठा आणि ग्राहक संपर्कबिंदूंमध्ये वाढलेल्या गतीचे प्रतिबिंब दर्शवते.



या ऐतिहासिक वर्षाबद्दल टिप्पणी करताना, स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, २०२५ हे वर्ष आमच्यासाठी नेहमीच खास राहील. हे भारतातील आमच्या २५ व्या वर्धापनदिनाचे प्रतीक आहे, आणि या काळात आम्ही आमच्या इतिहासातील सर्वात सुधारित आणि वैविध्यपूर्ण उत्पादन पोर्टफोलिओसह पुढे आलो आहोत, तसेच नेटवर्क आणि बाजार उपस्थितीच्या बाबतीत आम्ही आता सर्वात व्यापक आहोत.

# दत्ता मेघे मेडिकल कॉलेजच्या आर्ट क्लबने उत्साह आणि सकारात्मकतेने नवीन वर्षाचे स्वागत केले




**नागपूर , ३ जानेवारी २०२६ :** दत्ता मेघे मेडिकल कॉलेजच्या आर्ट क्लबमधील दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाच्या एमबीबीएस विद्यार्थ्यांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजी २०२६ या नवीन वर्षाचे आनंदाने स्वागत केले. या कार्यक्रमात सर्जनशीलता, विद्यार्थी सहभाग आणि मानसिक आरोग्य यावर भर दिला गेला. विद्यार्थ्यांनी हाताने सजावट केली आणि खास सेल्फी पॉइंट तयार केला, ज्यामुळे कॅम्पसवर आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये एकता, स्वतःची मते व्यक्त करणे आणि मानसिक आरोग्य सुधारणे हा होता. उत्सवाचा भाग म्हणून १ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे पिवळ्या रंगाचे कपडे घालून ग्रुप फ़ोटो घेण्यात आले, जे सकारात्मकता, आनंद आणि एकतेचे प्रतीक होते.

कार्यक्रमात डॉ. अनुप मरार, डायरेक्टर ऑफ-कॅम्पस, डीएमआयएचईआर; डॉ. उज्वल गजबे, डीन, दत्ता मेघे मेडिकल कॉलेज; डॉ. बी. आर. सिंग, व्हाइस डीन, दत्ता मेघे मेडिकल कॉलेज; आणि डॉ. बसंत गावंडे, सीएमएस, एसएमएचआरसी हजर होते. या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले आणि शैक्षणिक यशासोबत मानसिक आरोग्याचे महत्त्व सांगितले.

उत्सवाच्या आनंदात भर घालण्यासाठी मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या प्रसंगी एक संगीत बँडदेखील सुरू केले, ज्याद्वारे त्यांनी अकादमिक अभ्यासाबाहेरील आपली प्रतिभा दाखवली आणि सर्वांगीण विकासाचा संदेश दिला. या उत्सवातून संस्थेने भविष्यकालीन आरोग्यसेवा व्यावसायिकांमध्ये सर्जनशीलता, मैत्री आणि भावनिक आरोग्य वाढवण्याची आपली बांधिलकी दाखवली.

# मकर संक्रांत : जुनी परंपरा आणि तिळ-गुळखाण्यामागील आरोग्यशास्त्र

### चीफ डायटिशियन स्वाती अवस्थी, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर यांचे तज्ज्ञ मार्गदर्शन



**नागपूर , ३ जानेवारी २०२६ :** भारतामध्ये मकर संक्रांत हा सण साजरा करण्याची तयारी सुरू झाली की घराघरात तिळ आणि गुळाचा सुगंध दरवळू लागतो. शतकानुशतके चालत आलेली तिळ-गुळ खाण्याची ही जुनी परंपरा केवळ सांस्कृतिक प्रथा नसून आपल्या आहार आणि आरोग्याबद्दलच्या जाणिवेचे उत्तम उदाहरण आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरच्या मते, सण हे केवळ आनंद साजरा करण्याची संधी नाही, तर आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची संधी देखील आहे. मकर संक्रांतीला सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. यामुळे दिवस मोठे होऊ लागतात, शरीरात नवी ऊर्जा येते आणि हळूहळू थंडी कमी होऊ लागते. परंपरेनुसार, या ऋतूबदलाच्या काळात शरीर गरम ठेवणारे, रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे आणि एकूण आरोग्यास पूरक असे अन्न खाणे योग्य मानले जाते. तिळ आणि गुळ यांचे पारंपरिक मिश्रण यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील चीफ डायटिशियन स्वाती अवस्थी सांगतात की, तिळ हे नैसर्गिकरित्या उष्णता निर्माण करतात आणि त्यामध्ये चांगले फॅट्स असतात. त्यामुळे शरीर उबदार राहते, सांध्यांचे आरोग्य सुधारते आणि थंडीत ऊर्जा टिकून राहते. गुळामध्ये लोह, झिंक आणि मॅग्नेशियमसारखी महत्त्वाची खनिजे असतात, जी रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आणि हंगामी आजारांचा धोका कमी करतात. रोगप्रतिकारशक्तीव्यतिरिक्त तिळ-गुळ त्वचा आणि केसांसाठीही खूप फायदेशीर आहे. तिळातील पोषक घटक आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेला आतून पोषण देतात आणि हिवाळ्यात होणारा कोरडेपणा आणि निस्तेजपणा कमी करतात. गुळ रक्त शुद्ध करण्यास मदत करतो, ज्यामुळे त्वचेवर नैसर्गिक तेज येते आणि त्वचा निरोगी राहते.

पचनाच्या दृष्टीनेही तिळ-गुळखूप उपयुक्त आहे. गुळ पचनक्रिया सुधारतो आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करतो, तर तिळामधील फायबर पचनासाठी चांगले असते. सणासुदीच्या जेवणानंतर तिळ-गुळ खाल्ल्याने पोट हलके राहते. तसेच तिळ हे कॅल्शियमचा उत्तम शाकाहारी स्रोत असून हाडे मजबूत ठेवण्यास मदत करतात, विशेषतः महिलांसाठी आणि लहान मुलांसाठी. रिफाइंड साखरेपासून बनवलेल्या अनेक सणासुदीच्या गोड मिठाईपेक्षा तिळ-गुळअधिक आरोग्यदायी आहे. गुळामुळे शरीराला हळूहळू ऊर्जा मिळते आणि साखरेची पातळी अचानक वाढत नाही, तर तिळातील प्रथिने आणि चांगले फॅट्स शरीराला पोषण देतात. त्यामुळे तिळ-गुळ हे चवदार तसेच आरोग्यासाठीही पौष्टिक ठरते.

''तिळ-गुळघ्या, गोड गोड बोला'' ही पारंपरिक म्हण आपल्याला नात्यांमध्ये गोडवा वाढवण्याचा संदेश देते. आरोग्याच्या दृष्टीनेही ही म्हण योग्य ऋतूत योग्य अन्न खाण्याचे महत्त्व सांगते. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे आम्ही संस्कृती आणि आधुनिक पोषणशास्त्र यांचा संगम असलेल्या अशा पारंपरिक आहारपद्धती अंगीकारण्याचा सल्ला देतो.

# समीर मेघे यांच्या कार्यालयात सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ जयंती साजरी



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**वाडी, दि. ३**

दत्तवाडी येथील आमदार समीर मेघे यांच्या कार्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ माँसाहेब भोसले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला नगर परिषद वाडीचे अध्यक्ष नरेश चरडे यांनी, तर राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला नगरसेवक आनंदबाबू कदम यांनी पुष्पहार अर्पण केला. उपस्थित सर्व मान्यवरांनीही दोन्ही प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी नगरसेविका कल्पना सगदेव यांनी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर माहिती देत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रनिर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास नगराध्यक्ष नरेश चरडे, नगरसेवक आनंदबाबू कदम, केशव बांद्रे, दिनेश कोचे, सरिता यादव, कल्पना सगदेव, ज्योती भोयर, संगीता बावने, लिला रहांगडाले, सविता ईसळ, दिव्या तिरपुडे यांच्यासह राजुताई भोले, वाडी मंडळ अध्यक्ष कैलाश मंथापुरवार, ईशांत राऊत, अक्षय तिडके, लक्ष्मीनारायण केसरवानी, दिनेश प्रसाद, विशाल डोंगरे, गोविंदराव रोडे, चंद्रशेखर कावरे, दिवानजी रहांगडाले, राहुल तायडे, गुरुदास बावने, गौतम तिरपुडे, अविनाश ईसळ, आनंद यादव, लिलाधर भोयर, ओमप्रकाश शुक्ला, राजू शेळके, आभा पांडे, पिंकी करण, वर्षा शिंगरू, अंजली कुळकर्णी, दिपा डांगे, माधुरी थेटे, रंजीता यादव, कल्पना भोयर, मेघना कुटे, श्रद्धा जगदळे, माधवी बाघमारे, शालिनी काळे, शोभा सोमकुवर, दिप्ती चौके, प्रमिला ठेंगरे, सुलोचना भोरगडे, मंगला पडोळे, विद्या भागवत तसेच इतर कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याच कार्यक्रमात ज्ञान विद्या मंदिर, वाडी येथील विद्यार्थिनी निधी उपेंद्र भिसेन हिची अस्मिता हॉकी लीग, पुणे येथे निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# सराफाला १७.९५ लाखांचा चुना

**नागपूर, दि. ३**

एका दाम्पत्याने दागिने खरेदी केल्यानंतर पैसे न देता सराफा व्यापाऱ्याला १७.९५ लाख रुपयांचा चुना लावला. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी यश श्रीकांत तांबेकर (२७) रा. अयोध्यानगरच्या तक्रारीवरून आरोपी दाम्पत्यावर गुन्हा नोंदविला आहे. सुमित भंडारवार आणि स्नेहा भंडारवार रा. शिवसुंदरनगर, दिघोरी अशी आरोपींची नावे आहेत.

यश यांचे अयोध्यानगर चौकात न्यू प्रसन्ना ज्वेलर्स नावाने सराफा दुकान आहे. सुमित आणि स्नेहा त्यांचे जुने ग्राहक आणि ओळखीचे आहेत. गत ५ डिसेंबरच्या दुपारी आरोपी दाम्पत्य यशच्या दुकानात आले. सोन्याचे ब्रास्लेट, मोहनमाळ, मंगळसूत्र, ५ अंगठ्या आणि ६ चैन पसंत केल्या, ज्यांची किंमत २०.९५ लाख रुपये होती. आरोपींनी दुसऱ्या दिवशी आरटीजीएसद्वारे पैसे देण्याचे आश्वासन दिले. सिक्युरीटी म्हणून धरमपेठ बँकेचे २ धनादेश दिले आणि दागिने घेऊन निघून गेले.

# पोलीस रेझिंग डे राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रामटेक येथे संपन्न



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ३**

राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रमेश बरकते, पोलीस निरीक्षक अरविंदकुमार कतलाम व महाविद्यालयाचे प्राचार्य रविंद्र चन्ने,पर्यवेक्षक शैलेश परमार प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक निलेश टोंगसे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

पोलीस निरीक्षक अरविंदकुमार कतलाम यांनी कार्यक्रमामागची भूमिका व्यक्त करतांना, २ जानेवारी १९५६ ला महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना झाली. महाराष्ट्र पोलीस दल तत्परतेने जनसेवेत कार्यरत असून संपूर्ण समाजाला सुरक्षित जीवन प्रदान करीत आहे.त्यामुळे संपूर्ण सप्ताह पोलीस रेझिंग डे म्हणून महाराष्ट्रभर साजरा करण्यात येतो.

उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना, ज्याप्रमाणे शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षक शिस्त लावून त्यांचे जीवन घडवितात त्याचप्रमाणे समाजातील काही लोकांना शिस्त लावण्याची गरज असते. ती शिस्त कायद्याच्या आधारे पोलीस लावतात. समाजाला कायदा व शिस्तीतुन सुरक्षित करतात. नियमांचे पालन करण्यासाठी व करवून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. एक प्रगल्भ नागरिक तयार करण्यासाठी प्रयत्नरत राहतात असे विचार व्यक्त केले.

# महिला नायलॉन मांजा विक्रेत्यास अटक

**नागपूर, दि. ३**

गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने गस्ती दरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारावर नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एका महिलेस अटक केली. पोलिसांनी तिच्याकडून प्रतिबंधित मांजाच्या १७ चक्री जप्त केल्या. संगीता दीपक शाहू (५५) रा. निर्मलनगर, गोरेवाडा असे अटकेतील महिला आरोपीचे नाव आहे.

शुक्रवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास युनिट ५ चे पथक मानकापूर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान निर्मलनगर परिसरात राहणारी संगीता शाहू ही तिच्या घरूनच प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी संगीताच्या घरावर धाड टाकली. पंचासमक्ष तिच्या घराची झडती घेतली असता १७ चक्री नायलॉन मांजा मिळाला. पोलिसांनी २५,५०० रुपये किंमतीचा मांजा जप्त करून संगीताला अटक केली. तिच्या विरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील कार्यवाहीसाठी तिला मालासह मानकापूर पोलिसांच्या स्वाधिन केले. तिने मांजा कुठून आणला याचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोनि संदीप बुवा व त्यांच्या पथकाने केली.

# जयस्वाल यांच्या उपस्थितीत शेकडो आदिवासी युवकांचा शिवसेनेत प्रवेश



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ३**

शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे, पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांच्या कार्यप्रणालीवर व विचारांवर प्रेरित होऊन शनिवार दिनांक जानेवारी २०२५ रोजी मंत्री आशिष जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये रामटेक तालुक्यातील शेकडो आदिवासी युवकांनी शिवसेनेचा भगवा हाती घेऊन शिवसेनेत पक्षप्रवेश केला.

यापूर्वी पक्षात आदिवासी युवकांचे प्रमाण तुलनेने कमी होते; मात्र आज आदिवासी समाजातील युवक व भगिनी मोठ्या संख्येने शिवसेनेशी जोडले जात आहेत, ही अत्यंत आनंदाची व सकारात्मक बाब आहे. त्यामुळे मी स्वतः सर्व नवप्रवेशितांचे मनःपूर्वक स्वागत करतो. सर्वसामान्य जनतेच्या, विशेषतः आदिवासी समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी आपण सर्वांनी सामूहिक प्रयत्न करूया, असे आवाहन यावेळी केले. जनसेवेचा वसा अंगीकारून शिवसेनेचे विचार घराघरात पोहोचवावेत आणि समाजहितासाठी सातत्याने कार्यरत राहावे, असेही आवाहन केले''.

यावेळी शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, माजी सभापती संजय नेवारे, ग्रामपंचायत वरघाटचे सरपंच देवराज इनवाते, समाजसेवक विनोद मरसकोल्हे, युवासेना विभाग प्रमुख एकनाथ गोडबोले आदी उपस्थित होते.

शिवसेना पक्षप्रवेशामध्ये **सावंगी गावातील** -मोहित बमचर, सुभाष मडावी, गोपीचंद वरठी, सेवक भलावी, पंकज मारसकोल्हे, सनम आहाके, पप्पी टेकाम, कुणाल उइके, विक्की धुर्वे, घनश्याम खंडाते, सोहेल पठाण.

**तुमडीटोला येथील** –कमलदेव टेकाम, हीरालाल उइके, सेवकराम मडावी, कैलास मसराम, संजू खंडाते, मोहन टेकाम, राजकुमार उइके, रंगीलाल टेकाम, भारत आहाके, मनोहर सलामे. **खरपडा गावातील** – अभिषेक तिवारी, कार्तिक त्रिवेदी, हरजीत उइके, अंकित मसराम, प्रल्हाद कुंभरे, पवन इनवाते, प्रवीण आहाके, दिनेश खंडाते, सुनील आहाके, रूपेश टेकाम, संदीप पंधराम, संजू धुर्वे, नितेश त्रिवेदी, संदीप धुर्वे आदींनी पक्षप्रवेश केला.

# शालेय विद्यार्थ्यांना मौदा पोलिसांकडून वाहतूक नियमांचे धडे

## मौदा वाहतूक पोलिस शाखेचा उपक्रम



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मौदा, दि. ३**

शालेय विद्यार्थांनी जबाबदार व चांगला नागरिक बनावे या उद्देशाने मौदा पोलिसांकडून पोलिस स्टेशन येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मौदा पोलिस स्टेशन येथे मौदा शहरातील शिर्डी साई पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांना पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे यांनी वाहतूक नियमांबाबत माहिती देण्यासह व्यसनाधिनतेपासून दूर राहणे, सायबर गुन्हेगारी, सोशल मीडियाचा वापर आदी विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमादरम्यान मौदा वाहतूक पोलिस शाखेने विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देत नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल किटे व वाहतूक शाखेचे पोलिस कर्मचारी यांच्या चमूने पार पडलेल्या कार्यक्रमादरम्यान वाहतूक नियमांबाबत माहिती देताना विभागातील कर्मचाऱ्यांनी दुचाकी चालवताना हेल्मेटचा नियमित वापर करण्याचे आवाहन केले.

वाहन चालवताना मोबाईलवर बोलू नये, ट्रिपल सीट दुचाकी चालवू नये, दारू पिऊन दुचाकी चालवू नये, असे मार्गदर्शन केले. विशेषतः अल्पवयींनांनी वाहन चालवण्याचे दुष्परिणाम, त्यावर करावयाची कारवाई याबाबत माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाप्रसंगी पोलिस निरीक्षक सारीन दुर्गे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल किटे, वाहतूक पोलीस शिपाई अतुल निंबार्ते, शुभम ईश्वरकर पोलिस स्टेशन येथील कर्मचारी व शाळेतील शिक्षक शिक्षिका व आदी कर्मचारी उपस्थित होते.

# ई-रिक्षातूनअंमली पदार्थाची विक्री

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३**

लकडगंज पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर ई-रिक्षातून अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या आरोपीला अटक केली. त्याच्याकडून १ किलो ८५१ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे पोलिसांपासून वाचण्यासाठी आरोपीने ई-रिक्षाच्या सीटखाली एका स्कूल बॅगमध्ये माल लपवून ठेवला होता. फिरोज मुन्ना खान (४२) रा. वाजपेयीनगर, कळमना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

अमरदीप चित्रपटगृहाजवळ फिरोज खान नावाचा व्यक्ती ई-रिक्षातून गांजाची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पहाटे ४ वाजताच्या सुमारास सापळा रचून परिसरात धाड टाकली. ई-रिक्षा क्र. एमएच-४९/बीएम ९९३१ मध्ये वरील आरोपी बसलेला दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याजवळ काहीही मिळाले नाही. मात्र माहिती खात्रीशिर असल्याने पोलिसांनी त्याच्या ई-रिक्षाची कसून तपासणी केली असता ड्रायव्हींग सीटखाली एक स्कूल बॅग मिळाली.

# सोशल मीडियावर पिस्तूलासह व्हीडिओ

## २ अटकेत, शस्त्रही जप्त

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३**

सोशल मीडियावर पिस्तूलासह व्हीडिओ व्हायरल करून लोकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाला वाडी पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत समोर आले की, पिस्तूल त्याच्या नातेवाईकाकडे आहे. पोलिसांनी दोघांविरुद्धही गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली आणि शस्त्रही जप्त केले. गजराज सिंग उर्फ पारस सिंग नरेंद्रसिंग बाजवा (२०) रा. दत्तवाडी आणि शरवन सिंग कत्तार सिंग रंधावा (४५) रा. तळेगाव, वर्धा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

वाडी पोलिसांना शुक्रवारी सोशल मीडियावर एक व्हीडिओ मिळाला. त्या व्हीडिओमध्ये बाजवा याने पिस्तूलासह व्हीडिओ बनवून स्वतःला डॉन असल्यासारखे दाखवले होते. पोलिसांनी याची गंभीर दखल घेत बाजवा याला ताब्यात घेतले. पिस्तूलाबाबत विचारले असता तो उडवा-उडवीची उत्तरे देत होता. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने तळेगाव येथील रहिवाशी त्याचा मावसा रंधावा याच्याकडे पिस्तूल ठेवल्याची माहिती दिली. तात्काळ पोलिस त्याला घेऊन तळेगावला पोहोचले. रंधावाकडून पिस्तूल आणि मॅग्झिन जप्त केले. दोन्ही आरोपींवर आर्म्स ॲक्ट आणि मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली. आरोपींनी पिस्तूल कुठून आणले आणि स्वतःकडे पिस्तूल ठेवण्यामागे काय कारण आहे, याचा तपास पोलिस करीत आहेत. ही कारवाई पोनि राजेश तटकरे आणि त्यांच्या पथकाने केली.

# १६९७ वाहन चालकांवर कारवाई

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३**

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १६९७ वाहन चालकांवर कारवाई करून १,९९,२५० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये २ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून १,९४० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून ८०३० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# माजी सैनिक आणि समता सैनिक दल यांचा संयुक्त विद्यमाने शौर्य दिवस कार्यक्रम



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**कन्हान, दि. ३**

कन्हान शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माजी सैनिक आणि समता सैनिक दल कन्हान यांचा संयुक्त विद्यमाने शौर्य दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित माजी सैनिक पंजाब पाटील, जयवंत गटपाडे यांचा हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करण्यात आले . तसेच बुद्धवंदना घेऊन शहिद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना देऊन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी जयवंत गटपाडे, पंजाब पाटील, सम्राट पगारे यांनी भीमा कोरेगाव ऐतिहासिक लढाई बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात उपस्थित समाज बांधवांनी महार सैनिकांच्या समर्थनात विजयस्तंभाला मानवंदना देऊन लढाईत शहिद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजलि अर्पित करण्यात आली.

या प्रसंगी माजी सैनिक जयवंत गटपाडे, सम्राट पगारे, विलास मेश्राम, पंजाब पाटील, नाकसेन मानकर, पदमाचंद पुंचभाई, इंद्रपाल कांबळे, दिलीप तायडे सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# १.४० लाखाच्या मालावर डल्ला

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३**

बाहेरगावी फिरायला जाणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने घरफोडी करून रोकड आणि दागिन्यांसह एकूण १ लाख ४० हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी पंकज प्रकाश रायपूरकर (४५) रा. गांधीकुटीनगर, भांडेवाडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत २३ डिसेंबरला रायपूरकर कुटुंब घराला कुलूप लावून राजस्थान येथे फिरायला गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. हॉलमधील कपाटातून रोख ४० हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा एकूण १,४०,६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. १ जानेवारीला दुपारी रायपूरकर कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने स्वीपअंतर्गत महिला मतदार जागृती

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना महापालिकेत अभिवादन



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ३**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे निमित्त साधून मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात स्वीप कार्यक्रमाअंतर्गत मतदार जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला. सावित्रीबाई फुले यांच्या छायाचित्रासह रांगोळीच्या सहाय्याने महिला मतदान, सक्षम लोकशाही असे घोषवाक्य लिहून मतदारांमध्ये मतदानाप्रती जागरुकता निर्माण करण्याचा अभिनव उपक्रम राबविला. तसेच महानगरपालिका शाळेच्या विद्यार्थ्यांनी महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषा साकारत स्त्रीशिक्षण, सामाजिक समतेचा संदेश दिला.

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता मतदारांमध्ये मतदानासाठी जनजागृती करण्यासाठी असलेल्या राज्य निवडणूक आयोगाच्या स्वीप या कार्यक्रमा अंतर्गत महिला मतदारांना संदेश देणारी आकर्षक रांगोळी काढण्यात आली.

रांगोळी कलावंत श्री. संजय कश्यप व श्रीमती अनिता कश्यप यांनी सावित्रीबाई फुले यांचे चित्र असणारी रांगोळी साकारली. तर मनपाच्या संजयनगर माध्यमिक शाळेच्या विद्यार्थीनी कु. शिवानी वर्मा, कु. वैष्णवी शाहू यांनी सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांची वेशभूषा साकारत स्त्रीशिक्षण,समता व सामाजिक जागृतीचा संदेश दिला. महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी श्रीमती साधना सयाम यांचे मार्गदर्शनात तसेच संजय नगर माध्यमिक शाळेच्या शिक्षिका श्रीमती शशिकला चोंडे यांनी यासाठी पुढाकार घेतला.

# नागपुरात बंधुता परिषद उत्साहात संपन्न

**नागपूर, दि. ३**

समाजातील ताणतणाव दूर करून परस्पर बंधुभाव निर्माण करणे ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असून, त्यासाठी दुखावलेली मने जवळ आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन समरसता गतिविधीचे अखिल भारतीय सेवावस्ती प्रमुख डॉ. रमेश पांडव यांनी केले.

सन्मित्र सभेतर्फे आयोजित बंधुता परिषदेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या वेळी व्यासपीठावर परमात्मा एक सेवक मंडळाचे मार्गदर्शक अरुण रारोकर, सन्मित्र सभेचे अध्यक्ष राजन भूत तसेच परिषदेचे संयोजक डॉ. प्रा. सुधाकर इंगळे उपस्थित होते.

डॉ. पांडव यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात सांगितले की, भूतकाळात काय घडले, कोण बरोबर किंवा चूक यावर अडकून राहण्यापेक्षा आज बंधुतेची गरज आहे हे स्पष्टपणे सांगणे अधिक महत्त्वाचे आहे. उभयपक्षांनी हे स्वीकारले पाहिजे की, समाजाच्या पुढील वाटचालीसाठी बंधुभाव अनिवार्य आहे. बंधुभावाशिवाय समाज पुढे सरकू शकत नाही.

RNI NO. MAHMAR/ 2008/26657
This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657
हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१